शुध्द आरोग्यदायी ड्रायफ्रुटस्
काजु | खिसमिस | खोबरं | केर सांगरी | मेलन सीडस्
बदाम | काळा मनुका | गाईचे तुप | कागदी बदाम
अंजीर | जरदाळू | धावडा डिंक | खारा काजू
अक्रोड | मखाना | मामरा बदाम | चिया सीडस् | मसाला काजू
खारा पिस्ता | खारीक | खजुर | पमकीन सीडस् | खारा बदाम
ड्राईड पायनापल, मँगो, किवी, स्ट्रॉबेरी, पॉमेलो, क्रॅनबेरी, मिक्स फ्रुट
भूमी एजन्सीज सुकामेवा आणि मसाल्याचे ठोक व किरकोळ विक्रेते
मिक्स खडा मसाला उपलब्ध
आनंद कॉम्प्लेक्स, दाळ मंडई, अ.नगर. M. 9011163452



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

गोड गोड हुरडा गरम गरम वनभोजन
संपूर्ण परिवारासह साईबनमध्ये
हुरडा पार्टी
निसर्गाचा मनमुराद आनंद घेऊया
मनोरंजनाची साधने व इतर बरेच काही
आकर्षक पॅकेज उपलब्ध आजच संपर्क करा
डॉ. कांकरियांचे साईबन
वेळ : सकाळी ९ ते सायं ५
साईबन कृषी पर्यटन केंद्र, एम.आय.डी.सी. मागे, अहमदनगर
हेल्पलाईन - 9112288622
9850500905 / 9096639368

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, मंगळवार दि. २४.१२.२०२४ | अंक नं. २४८ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

# कंपनीच्या कंपाऊंडमध्ये उभ्या असलेल्या वाहनाच्या चार लाखांच्या टायरची चोरी

नगर - कंपनीच्या आत उभ्या असलेल्या बारा चाकी गाडीचे चार लाख रुपये किमतीचे टायर कोणीतरी अज्ञात चोरट्याने गाडीला जॅक लावून चोरून नेल्याची घटना केडगाव परिसरातील हॉटेल के ९ जवळ, ऑटोबन ट्रकिंग कॉर्पोरेशन प्रा.लि. केडगाव शाखा येथे सोमवारी (दि. २३) पहाटेच्या सुमारास घडली.

या बाबतची माहिती अशी की ऑटोबन ट्रकिंग कॉर्पोरेशन (भारत बेंझ ऑथोराईझ डिलर) प्रा. लि. कंपनीच्या केडगाव शाखेत, भारत बेंझ कंपनीत निर्माण होणाऱ्या गाड्याचे विक्री आणि सर्व्हिसचे काम केले जाते. मागील महिन्यात कंपनीत भारत बेंझ कंपनीची मॉडिल ३५२३ आर १२ चाकी गाडी कामा निमित्त कंपनीचे कंपाउंड एरीयात लावलेली होती.

दि.२३ रोजी सकाळी कंपनीचे कर्मचारी योगेश मिरपगार हा नवीन गाड्यांची कंपाउंड मध्ये पाहणी करीत असताना त्याला भारत बेंझ गाडीचे टायर दिसले नाही. भारत बेंझ कंपनीची मॉडिल ३५२३ आर १२ चाकी गाडी जॅक लावलेल्या स्थितीत दिसुन आली व त्या गाडीचे मागील आठ टायर व्हिल रिंम सहित दिसुन आले नाही, म्हणून टायरचे कंपनीचे आजुबाजूच्या परिसरात पाहणी केली असता टायर कोठेही दिसुन आले नाही. त्यामुळे कोणीतरी अज्ञात व्यक्तीने गाडीचे टायर चोरी करण्याचे उद्येशाने खोलून चोरुन नेल्याची खात्री झाली. चोरट्याने कंपनीचे कंपाउंड मधील ३ लाख २० हजार रुपये किमतीचे अपोलो कंपनीचे ८ ट्युबलेस टायर, ८० हजार रुपये किमतीचे भारत बेंझ मॉडिल ३५२३ आर गाडीचे व्हिल रिम बोल्ट सहित ८ नग असे ४ लाख रुपये किमतीचे टायर चोरुन नेले.

या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी मॅनेजर सागर हनुमंत मोरे (वय ३१, रा. उदयनराजे नगर, केडगाव, अ.नगर मुळ रा. रांधे ता. पारनेर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीच्या गुन्ह्याची नोंद केली आहे.

# बाजारपेठेतील दुकान फोडून चोरट्यांनी रोकड पळविली

## नवीपेठ येथील घटना, अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल

नगर - बंद दुकानाचे शटरला असलेले कुलुप कोणीतरी अज्ञात चोरट्याने कशाच्या तरी सहाय्याने तोडुन शटर उचकाटुन आत प्रवेश करुन दुकानातील काऊंटरचे तीनही ड्रॉवरचे लॉक तोडून आतमध्ये ठेवलेली रोख रक्कम ४५ हजार रुपये चोरुन नेले आहे. ही घटना नवीपेठ, येथील शहर बँक समोरील जैन बँगल स्टोअर्स या दुकानात घडली.

या बाबतची माहिती अशी की कौशल विजयकुमार पांडे (वय ५३, रा. देशमुख गल्ली, चौपाटी कारंजा) यांचे नवीपेठ भागात जैन बँगल स्टोअर्स नावाचे होलसेल दुकान आहे. शनिवारी (दि.२१) सकाळी नेहमी प्रमाणे दुकान उघडुन, दुकानातील कामकाज करुन दिवसभरात व्यवहाराचे जमलेले एकुण ४५ हजार रुपये दुकानाच्या विविध तीन कॅश काऊंटरमध्ये विभागून ड्रॉवर लॉक करुन ठेवले. त्यानंतर रविवारी (दि.२२) सकाळी विजयकुमार पांडे हे दुकान उघडण्याकरीता गेले असता त्यांना शटरचे बाहेरील लावलेले कुलूप दिसुन न आल्याने त्यांनी दुकानात कामाला असलेल्या मुलामार्फत शटर उघडुन दुकानात गेले असता त्यांना काऊंटर वरील सामान अस्ताव्यस्त झाल्याचे दिसले.

त्यावेळी त्यांनी ही घटना मुलगा कौशल यास फोन करुन सांगितल्याने कौशल लागलीच दुकानात आला असता त्याला दुकानाचे काऊंटरला असलेले तीनही ड्रॉवर तुटलेले दिसल्याने पैसे ठेवलेले ड्रॉवर चेक केले असता दुकानात तीनही ड्रॉवरमध्ये ठेवलेले रक्कम दिसुन आली नाही. तसेच दुकानातील बाकीचे सर्व सामान व्यवस्थित होते. यावरुन खात्री झाली की कोणीतरी अज्ञात चोरट्याने दुकानाचे शटरला असलेले कुलुप कशाच्या तरी सहाय्याने तोडुन शटर उचकाटुन त्यातून आत प्रवेश करुन दुकानातील काऊंटरचे ड्रॉवरचे लॉक तोडून आतील ४५ हजार रुपये चोरुन नेले आहे. या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी कौशल पांडे यांनी दिलेल्या माहितीवरुन अज्ञात चोरट्या विरूद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३३१ (४), ३०५ प्रमाणे चोरीच्या गुन्ह्याची नोंद केली.





शहरात महापालिकेच्या अतिक्रमणविरोधी पथकाकडून अतिक्रमण हटाव मोहीम सातत्याने राबविली जात आहे. या पथकाने महापालिका मुख्यालयासमोरील अहिल्यानगर ते छत्रपती संभाजीनगर रस्त्याच्या बाजूने असलेल्या अतिक्रमणधारकांना अतिक्रमणे स्वतःहून काढण्याची सूचना दिली होती. त्यानुसार २४ डिसेंबर रोजी कारवाईपूर्वीच सर्व टपरीधारक, दुकानदार, हातगाडीवाले यांनी आपली अतिक्रमणे स्वतःहून काढून घेतली. त्यामुळे हा रस्ता पूर्णपणे मोकळा झाल्याचे छायाचित्रात दिसत आहे. (छाया - बबलू शेख)

# सावेडी येथील नायलॉन मांजा विक्रेत्यावर पोलिसांची कारवाई

## ४० हजाराचा नायलॉन मांजा जप्त करत केला गुन्हा दाखल

नगर - महाराष्ट्र राज्यात विक्री करण्यास बंदी असलेला नायलॉन मांजा विक्री करणाऱ्या सावेडी परिसरातील श्रमिक नगर येथील दुकानावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून ४० हजार रुपयांचा नायलॉन मांजा जप्त केला. या प्रकरणी ऋषीकेश राजु दिकोंडा (वय २४, रा. श्रमिकनगर, सावेडी) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस अधीक्षक राकेश ओला, यांनी स्थानिक गुन्हे शाखा, अ.नगर व जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना आगामी मकर संक्राती सणाचे निमित्ताने जिल्हयातील पोलीस ठाण्याच्या हद्दीत पक्षी, प्राणी व मानवी जिवास इजा करणारा व महाराष्ट्र राज्यात विक्रीस बंदी असलेला नायलॉन मांजा विक्री करणारे इसम, दुकानदार यांचे दुकानावर छापा टाकुन कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत.



सावेडी येथील नायलॉन मांजा विक्रेत्यावर कारवाई केल्यानंतर त्याच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

या आदेशान्वये पो.नि.दिनेश आहेर यांनी स्थानिक गुन्हे शाखा व तपास पथकास कारवाई करण्यासाठी रवाना केले. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास मिळालेल्या माहितीवरून पथकाने श्रमिकनगर येथे नायलॉन मांजा विक्री करणाऱ्या ऋषीकेश राजु दिकोंडा याला पकडले. पोलिसांनी त्याचे ताब्यातुन ४० हजार रुपये किंमतीचा नायलॉन मांजा जप्त केला. या प्रकरणी पो.कॉ. रविंद्र घुंगासे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तोफखाना पोलीस ठाण्यात ऋषिकेश दिकोंडा याच्याविरूद्ध बी.एन.एस. २०२३ चे कलम २२२,१२५ सह पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम ५, १५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार संदीप पवार, सोमनाथ झांबरे, शिवाजी ढाकणे, रविंद्र घुंगासे यांनी केली आहे.

Teakwood, Pinewood, Burmateak, Ashwood, B.T.C.Patti, Moulding, Raling, Pillers.
PITRODA SALES
Gulmohor Road, Savedi Cont.- 9823704000
(SHOP) Trust of 18 Years
All Types MDF Sheet, Acrylic Sheet, Decorative Pillers CNC Design Work
SHREE LAXMI FURNITURES
Agarkar Mala Cont.- 9860288471, 9823511999
(WORKSHOP) Trust of 52 Years



# प्रेमदान चौकातील सिग्नलचा बिघाड बेततोय नागरिकांच्या जीवावर

शहरातील प्रेमदान चौकात असलेल्या वाहतूक सिग्नलमध्ये गेल्या काही दिवसांपासून बिघाड झालेला असून एकाच वेळी लाल आणि हिरवे दिवे लागत असल्याने वाहनचालक संभ्रमात पडत आहेत. त्यामुळे अनेक छोटे-मोठे अपघात होत आहेत, हा सिग्नलचा बिघाड नागरिकांच्या जीवावर बेतण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे प्रशासनाने तात्काळ याकडे लक्ष देऊन हा सिग्नल दुरुस्त करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. (छाया धनेश कटारिया)

# सुरज जाधव व टोळीविरोधात कारवाई करा अन्यथा आंदोलन

## नागरिकांचे तोफखाना पोलिसांना निवेदन, ८ दिवसांची दिली मुदत

नगर- रामवाडी झोपडपट्टीतील रहिवाशांनी सुरज सुभाष जाधव आणि त्याच्या टोळीविरोधात कठोर कारवाईची मागणी करत अहिल्यानगर पोलीस प्रशासनाला निवेदन दिले आहे. रहिवाशांनी आरोप केला आहे की, सुरज जाधव व त्याच्या साथीदारांनी १५ डिसेंबर रोजी रात्री रामवाडी परिसरात तलवारी, काठ्या व लाठ्या घेऊन दहशत माजवली. त्यांनी रहिवाशांना मारहाण केली तसेच जातीवाचक शिवीगाळ केली.

या घटनेमुळे झोपडपट्टीत दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून तक्रार करणाऱ्या व्यक्तींसह सर्वच रहिवाशांमध्ये असुरक्षिततेची भावना आहे. रहिवाशांच्या म्हणण्यानुसार, संबंधित प्रकरणात तोफखाना पोलीस स्टेशनला गुन्हे दाखल झाले आहेत; मात्र अद्याप कोणत्याही गुन्हेगारास अटक करण्यात आलेली नाही.

सुरज सुभाष जाधव हा गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वीही गंभीर स्वरूपाचे अनेक गुन्हे दाखल असल्याचे रहिवाशांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे. तो संघटित टोळीच्या मदतीने गुन्हेगारी कृत्ये करत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. यापूर्वी १६ डिसेंबर रोजीही पोलीस अधिक्षक कार्यालयाला या प्रकरणाबाबत निवेदन देण्यात आले होते. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्यामुळे संतप्त झालेल्या रहिवाशांनी आता पोलीस प्रशासनाला आठ दिवसांची मुदत दिली आहे. जर या कालावधीत कारवाई झाली नाही, तर रहिवाशांनी तोफखाना पोलीस स्टेशनसमोर धरणे आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. रामवाडीतील नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर असून प्रशासनाने तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. यावेळी माजी नगरसेवक भाऊसाहेब उडानशिवे, पप्पू पाटील, सागर साठे, प्रकाश वाघमारे, विनोद घोरपडे, गंगाराम शेळकर,विजय भोसले, फैयाज शेख, समीर चांदणे आदी उपस्थित होते. (छायाचित्र पान २ वर)

Career DISHA
2 लाखाहून अधिक विद्यार्थ्यांनी अनुभवलेला कोर्स
DCGA Diploma Course in Graphics & Office Automation
JUST IN 8900/-
GET READY FOR YOUR JOB
JOIN TODAY
MS-OFFICE | TALLY PRIME | GST | CORELDRAW | ILLUSTRATOR | PHOTOSHOP | WEB PAGE DESIGNING | BASIC HARDWARE
Duration : 6 Months
Delhi Gate Branch 9371051769 | Old ST stand Branch 9371151769 | Pipeline Branch 7447761769

डॉ.अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine) DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
चेहऱ्यावरील स्नायू फडकणे यासाठी बोटॉक्स इंजेक्शनची सुविधा
पाठदुखी/मज्जा रज्जूवरील आजार
डोळ्यांच्या नसांवरील सूज/ऑप्टिक न्यरैटिस
यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
सर्व आजारांसाठी ऍडमिट सुविधा उपलब्ध.
सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे
एशियन नोबल हॉस्पिटल प्रेमदान चौक, अ.नगर रोज दुपारी १ ते ५ या वेळेत

आंतरराष्ट्रीय दर्जाचे अद्यावत सुविधांयुक्त
इंडो आयरिश हॉस्पिटल
आयोजित
हृदयरोग, मधुमेह, उच्चरक्तदाब, पाठदुखी, गुडघेदुखी, स्त्रीरोग, बालरोग, किडनी विकार, डायलेसीस, जनरल सर्जरी, कान, नाक, घसा
मोफत सर्व रोग तपासणी शिबीर
सकाळी १० ते ५ वा. (रविवार सोडुन)
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना | आयुष्मान भारत योजना | मुख्यमंत्री सहाय्यता निधी
मोफत ॲन्जीओप्लास्टी
माफत डायलेसीस/किडनी विकार
माफत कर्करोग शस्त्रक्रिया
मोफत नवजात अतिदक्षता विभाग
मोफत अपघात व पॉली ट्रॉमा फ्रॅक्चर
सर्व कॅशलेस सुविधा उपलब्ध | मोफत साखर तपासणी
२४ तास अत्यावश्यक व ॲम्ब्युलन्स सुविधा उपलब्ध | ॲडमिशनची गरज भासल्यास ५०% पर्यंत सवलत
सोनोग्राफी, एक्स-रे, पॅथालॉजी, सीटी स्कॅन, २डी इको, ईसीजी, एन्जीओग्राफी, वंध्यत्व निवारण व इतर सर्व तपासणीवर ५०% पर्यंत सवलत
शिबीरस्थळ
इंडो आयरिश हॉस्पिटल
तपोवन रोड, सावेडी, अहिल्यानगर.
फोन : 0241-2423336,
मो. 9130423336, 9860310001

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## खलील जिब्रान – द प्रोफेट...

देवदूत, देवदूताचं विहारवन आणि अग्रदूत यांचा सुंदर भावानुवाद त्र्यं. वि. सरदेशमुख यांनी केला आहे. १८८३ साली लेबनॉनमधील एका छोट्याशा गावात जिब्रान झाला. सध्या लेबनॉन अशात अस्वस्थ आहे.

सिरीया, पॅलेस्टाईन यांच्या शेजारील लेबनॉन हा प्राधान्यानं ख्रिश्चनांचा देश. ख्रिसमस जवळ आलंय. येथील व सर्वदूर स्थानिक ख्रिश्चन बंधुभगिनींना नाताळच्या शुभेच्छा. लेबनॉन – सौंदर्य व अमरत्व यांचं प्रतीक असणारी भूमी म्हणून बायबलमध्ये लेबनॉनचा उल्लेख आहे. अशा या पुण्यभूमीत प्रेम व मांगल्याचा निस्सीम उपासक असलेल्या जिब्रानच्या जन्माने महत्त्व वाढले.

जिब्रानचे 'द प्रोफेट' हे पुस्तक जगभर ख्याती पावलं. अनेक भाषांत त्याचे भाषांतर झाले. एका सत्पुरुषाच्या जीवन हेतूचा ते उलगडा करते. त्याच्या




वचनांचं माधुर्य व गांभीर्य अनुपमेय आहे.

जिब्रानच्या इंग्रजी भाषेत एक सुंदर लय आहे. मूळ 'द प्रोफेट' अरबीत आहे. 'द गार्डन ऑफ द प्रॉफेट (देवदूताचं विहारवन) हा त्या द प्रोफेटचा उत्तरार्ध आहे.

जिब्रानची संवाद–वचनं मराठीत उतरताना आरती प्रभूंच्या (खानविलकर) गझल गीतांची आठवण होते. आपल्या दुर्दैवाने ही दोन्ही प्रतिभावंत जीवनाचे अर्धशतकही पूर्ण करू शकले नाही.

२५ डिसेंबर – नाताळ, ख्रिसमसच्या शुभकामना. येशूच्या करुणा व उदाहरतेचा प्रत्यय जगाला येवो.



## मोपेडच्या धडकेत महिला गंभीर जखमी

नगर – भरधाव वेगातील ॲक्टिवा मोपेडने धडक दिल्याने पुढे चाललेल्या मोपेडवरील महिला गंभीर जखमी झाल्याची घटना तारकपूर परिसरात घडली. अंजली भास्कर वराडे (वय ४१, रा. सिव्हिल हाडको सावेडी रोड) या किराणा माल आणण्याकरिता तारकपूर येथील प्रकाश प्रोव्हिजन स्टोअर्स येथे जात असताना समोरून भरधाव वेगात आलेल्या ॲक्टिवा मोपेड (क्र. एम एच १२ एफ एम ८९२०) वरील स्वाराने त्यांना धडक दिली. या धडकेत अंजली वराडे यांच्या पायाचे हाड तुटून त्या गंभीर जखमी झाल्या अपघात होताच मोपेडस्वार वाहन तेथेच टाकून पसार झाला. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अंजली वराडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बी एन एस २०२३ चे कलम २८१, १२५ (अ)(ब) ३२४ (ड)( ई) मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम १८४, १३५ (अ)(ब) अन्वये अपघाताच्या गुन्ह्याची नोंद केली.

## शशिकांत मुथ्था (संकेतवाला) यांचे अल्प आजाराने निधन

नगर – येथील रहिवासी शशिकांत हिरालाल मुथ्था



(संकेतवाला, रा.मुनोत इस्टेट, संकेत हॉटेल पाठीमागे) यांचे २३ डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, २ बहिणी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. संकेत, तुषार मुथ्था यांचे ते वडील होत. ते संकेत हॉटेलचे संचालक होते त्याचप्रमाणे योग विद्या धामचे अध्यक्ष होते.

## श्रीमती हेमलता बारगजे यांचे हृदयविकाराने निधन



नगर – येथील श्रीमती हेमलता बाळासाहेब बारगजे (वय ६५, रा.सोलापूर) यांचे २३ डिसेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर सोलापूर, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे ७ पुतणे, १ पुतणी असा परिवार आहे. महेश बारगजे यांच्या त्या काकू होत.

## श्रीमती शशिकलाताई क्षीरसागर यांचे निधन



नगर – पटवर्धन स्मारक जवळ, सावेडी येथील श्रीमती शशिकलाताई वसंतराव क्षीरसागर (वय ९१) यांचे २२ डिसेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे, नातसुना, पतवंडे असा परिवार आहे.

## शांतीलाल कोठारी यांचे संथाराव्रतात निर्वाण

नगर – वडगाव शेरी, पुणे येथील रहिवाशी शांतीलाल



चुनीलाल कोठारी (वय ८४) यांचे २३ डिसेंबर रोजी संथाराव्रतात निर्वाण झाले. त्यांना महाराष्ट्र गौरव, खान्देश केसरी पूज्य गौतममुनीजी म.सा. (बरसादाता) यांनी दिलेल्या संथारा व्रताची पाचखाण पुर्णाहुती झाली. नगर येथील रहिवासी कांतीलाल कोठारी यांचे ते बंधू तर गिरीश कोठारी (रा.खिस्तगल्ली) यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात १ मुलगा, ३ मुली असा परिवार आहे.

## शांतीलाल मुथ्था यांचे अल्प आजाराने निधन

नगर – पूनममोतीनगर येथील रहिवासी शांतीलाल मोतीलाल



मुथ्था (वय ७४) यांचे २१ डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. ते वर्धमान साडी सेंटरचे संचालक होते.

त्यांच्या मागे २ भाऊ, भावजय, २ मुले, सुना, २ मुली, जावाई, नातवंडे असा परिवार आहे. लाभेश व वर्धमान मुथ्था यांचे ते वडील तर चंपालाल व इंद्रकुमार मुथ्था यांचे बंधू होत.

## 'साकेश्वर'चे उपाध्यक्ष विश्वनाथ आडसूळ यांचे निधन

नगर – साकेश्वर ग्रामिण विकास सेवा संस्थेचे विद्यमान



उपाध्यक्ष विश्वनाथ माणिक आडसूळ (वय ५१) यांचे २३ डिसेंबर रोजी सायंकाळी दुःखद निधन झाले. गेल्या काही दिवसापासून ते आजाराशी झुंजत होते.

त्यांच्या पश्चात आई–वडील, पत्नी, २ मुले, २ भाऊ, भाऊजया असा परिवार आहे. साकेश्वर ग्रामिण विकास सेवा संस्थेअंतर्गत असलेल्या इंजिनिअरींग, एमबीए, पॉलिटेक्नीक, बी. एड, फार्मसी, आर्टस् कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज व तसेच लॉ कॉलेजच्या विकासात त्यांचे मोठे योगदान होते.

## अब्दुलरज्ञाक शेख यांचे निधन

श्रीरामपूर – श्रीरामपूर येथील इराणी गल्ली, वॉर्ड नं.१,



नवीन कोर्टा समोर, कॉलेज रोड अब्दुलरज्ञाक शकुर शेख (वय ८३) यांचे २४ डिसेंबर रोजी सकाळी ७ वा. अल्पश: आजाराने निधन झाले. त्यांच्यावर दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले.

मार्केट यार्ड शेजारील अन्वर ऑटो गॅरेजचे मालक अन्वरभाई शेख यांचे ते थोरले बंधू, स्टेट बँक चौकातील रज्ञाक ऑटो गॅरेज चे मालक सत्तार शेख, जब्बार शेख व अल्ताफ शेख यांचे वडील, गणी ऑटो इलेक्ट्रिकल्सचे मालक जमीर शेख, स्टार बॅटरीचे मालक रहिम शेख, स्टार कार डेकोरचे मालक वसिम शेख यांचे ते चुलते होत.

# शहरात भाजपाचे १ लाख सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट

### प्रशांत मुथा यांचे प्रतिपादन; अहिल्यानगर शहरात सदस्य नोंदणी अभियानास सुरुवात

नगर – भारतीय जनता पार्टीची अहिल्यानगर शहरात सदस्य नोंदणी अभियानास उत्साहात सुरुवात झाली आहे. शहरातील प्रत्येक प्रभागात व बुथ परिसरात पक्षाचे पदाधिकारी नोंदणी अभियान राबवत आहेत. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हात बळकट करण्यासाठी नगर शहरातून पक्षाचे १ लाख नागरिकांची सदस्य नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे, असे प्रतिपादन अहिल्यानगर भारतीय जनता पार्टीचे सदस्य नोंदणी संयोजक प्रशांत मुथा यांनी केले.



पारिजात चौकात नागरिकांनी मोबाईलवर मिस कॉल देवून भाजपचे सदस्य नोंदणी अभियानास प्रतिसाद दिला. यावेळी संयोजक प्रशांत मुथा, प्रभाग ४ चे प्रभारी अशोक गायकवाड, प्रिया जानवे आदींसह पक्षाचे पदाधिकारी.

अहिल्यानगर शहरात भारतीय जनता पक्षाच्या वतीने शहर जिल्हाध्यक्ष ॲड.अभय आगरकर यांच्या मार्गदर्शनाखाली सदस्य नोंदणी अभियानास सुरवात करण्यात आली आहे. प्रभाग ४ चे प्रभारी अशोक गायकवाड यांच्या नियोजनाखाली सावेडी उपनगर मध्ये पारिजात चौकात बूथ लावून अभियान राबवण्यात आले. यावेळी शहराचे सदस्य नोंदणी संयोजक प्रशांत मुथा, महिला आघाडीच्या अध्यक्षा प्रिया जानवे आदींसह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

प्रास्ताविकात अशोक गायकवाड म्हणाले, भारतीय जनता पार्टीच्या सदस्य नोंदणी अभियानस सावेडी भागातून नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. नागरिक स्वतःहून बुथवर येत पक्षाचे सदस्य होत आहेत. मोबाईलवरून ८०००००२०२४ या नंबरला केवळ मिस कॉल देवून आलेल्या लिंकमध्ये आपली प्राथमिक माहिती भरून पक्षाचे सदस्यत्व होता येते. अशा सहज, सोप्या व आधुनिक पद्धतीने भाजपचे सदस्य होता येते.

यावेळी अनिल सबलोक, मुकुल गंधे, दामोदर बठेजा, रामदास आंधळे, श्वेता पंधाडे, सुजाता औटी, रेणुका करंदीकर, संगीता खरमाळे, राजू मंगलारप, आकाश सोनावणे, सुजित खरमाळे आदी उपस्थित होते.

# दुचाकी वाहनांकरीता नवीन वाहन क्रमांक मालिका सुरू

नगर – दुचाकी संवर्गातील नवीन वाहनांकरिता नवीन वाहन क्रमांक मालिका सुरू करण्यात येत असून इच्छुक अर्जदारांनी २६ डिसेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी २.३० वाजेपर्यंत पसंती क्रमांकाच्या विहीत शुल्काच्या धनाकर्षासह अर्ज चांदणी चौकातील नवीन इमारतीत खिडकी क्रमांक २० येथे जमा करण्याचे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे यांनी केले आहे.

अर्ज सादर करताना वाहन नावावर असलेल्या व्यक्तीच्या नावाच्या अर्जासोबत पत्त्याचा पुरावा, पॅन कार्ड, आधार कार्डला संलग्न असलेला भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे. पसंती क्रमांक धनाकर्ष अहमदनगर कॅम्प ब्रँच, ट्रेझरी ब्रँच कोड नं १३२९६ करिता देय असणे आवश्यक आहे.

एका पसंती क्रमांकासाठी एकच अर्ज आला असेल त्यांची व एकाच पसंती क्रमांकासाठी दोन किंवा दोनपेक्षा जास्त अर्ज आले असतील त्यांच्या पसंती क्रमांकाची यादी २६ डिसेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता वाजता चांदणी चौक येथील नवीन इमारतीत सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात येईल. एकाच पसंती क्रमांकासाठी दोन किंवा दोन पेक्षा जास्त अर्ज आलेल्या यादीमधील पसंती क्रमाकांसाठी ज्यांनी अर्ज केला आहे, अशा अर्जदारांनी २७ डिसेंबर रोजी दुपारी १.३० वाजता पसंती क्रमांक शुल्काच्या धनाकर्षाव्यतिरिक्त जादा रक्कमेचा धनाकर्ष बंद लिफाफ्यात सिलबंद करून खिडकी क्रमांक २० येथे जमा करून याच दिवशी दुपारी ३ वाजता उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे दालनात उपस्थित राहावे.

लिलावासाठी उपस्थित राहणाऱ्या अर्जदाराने किंवा त्यांच्या प्रतिनिधीने ओळखपत्र व प्राधिकार पत्रासह हजर रहावे. कार्यालयात सादर झालेले जादा रक्कमेचे धनाकर्ष अर्जदारासमोर उघडण्यात येतील. ज्या अर्जदाराने जास्त रक्कमेचा धनाकर्ष सादर केला असेल त्याला तो पसंती क्रमांक देण्यात येईल व उर्वरित कमी रक्कमेचा धनाकर्ष संबंधित अर्जदारांना परत देण्यात येईल. पसंती क्रमांकासाठी कोणत्याही अर्जदारास दूरध्वनी, भ्रमणध्वनी अथवा एसएमएस केला जाणार नाही, याची नोंद घेण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

## व्हॉलीबॉल राज्य संघाची २६ डिसेंबर रोजी निवड चाचणी

नगर – जयपूर येथे ७ ते १३ जानेवारी २०२५ दरम्यान होणाऱ्या व्हॉलीबॉल राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेसाठी राज्य संघाची निवड चाचणी २६ डिसेंबर रोजी सकाळी ८ वाजता पुणे शहरात गुलटेकडी येथील चंद्रशेखर आगाशे शारिरीक शिक्षण महाविद्यालयात होणार आहे.

निवड चाचणी दरम्यान निवास व भोजनाची व्यवस्था खेळाडूंनी स्वतः करायची आहे. निवड चाचणीसाठी पुरुष व महिला खेळाडूंनी उपस्थितीत रहावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी आमसिद्ध सोलनकर यांनी केले आहे.

## गाडगीळ पटांगणातील दारु अड्ड्यावर पोलिसांचा छापा

नगर – बेकायदेशीररित्या गावठी हातभट्टीची दारू विक्री करणाऱ्या अड्ड्यावर कोतवाली पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईचा ११ हजार रुपये किमतीची ११० लिटर गावठी हातभट्टी दारू जप्त केली. ही कारवाई नालेगाव परिसरातील गाडगीळ पटांगण येथील घराच्या आडोशाला असलेल्या अड्ड्यावर सोमवारी (दि.२३) सायंकाळी केली. या कारवाईत पोलिसांनी अतुल रावसाहेब दातरंगे (वय ३२, रा. गाडगीळ पटांगण, नालेगाव) यास ताब्यात घेऊन त्याच्याकडील दोन ड्रम मध्ये भरलेली ८० लिटर दारू, आणि एक अर्ध्या ड्रम मध्ये भरलेली तीस लिटर अशी एकशे दहा लिटर दारू दारू जप्त केली.

कोतवाली पोलीस ठाण्यात पो. कॉ.सुरज कदम यांच्या फिर्यादीवरुन महाराष्ट्र दारू प्रतिबंध कायदा कलम ६५ (ई) अन्वये गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

# अनधिकृत फ्लेक्स प्रकरणी शहरात १२ जणांवर गुन्हे दाखल

### महापालिकेकडून ७११ फलकांवर कारवाई : ३४ हजारांचा दंड वसूल

नगर – महापालिका क्षेत्रात परवानगी न घेता मोठ्या प्रमाणात बॅनर, फलक, मोठे जाहिरात बोर्ड लावल्याचे प्रकार समोर आले आहेत. अशा अनधिकृत फलकांवर व फ्लेक्स बोर्डवर महानगर पालिकेमार्फत कारवाई सुरू करण्यात आली आहे. गेल्या महिनाभरात महानगरपालिका प्रशासनाने १२ जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. तर ७११ फलकांवर कारवाई करत ३४ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.



शहरात लावलेले अनधिकृत फ्लेक्स काढताना महापालिकेचे कर्मचारी.

अनधिकृत फ्लेक्स बोर्ड संदर्भात कारवाईसाठी न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. या पार्श्वभूमीवर मनपा प्रशासनामार्फत सातत्याने आढावा घेऊन अनधिकृत फलकांवर कारवाई सुरू करण्यात आली आहे. शहरातील प्रमुख रस्ते, चौक अशा ठिकाणी काही संस्था, नागरिक, व्यावसायिक आस्थापना, राजकीय कार्यकर्ते मनपाची परवानगी न घेता फ्लेक्स बोर्ड लावत आहेत. महानगरपालिकेने याची तपासणी करून गेल्या महिनाभरात अनधिकृत फ्लेक्स लावणाऱ्या १२ जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. ७११ फलकांवर दंडात्मक कारवाई करून ३४ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

तसेच, मनपामार्फत शहरात तात्पुरते फलक लावण्यासाठी तीन दिवसांसाठी १३४ फलकांना तात्पुरत्या परवानग्या दिल्या आहेत. त्या पोटी महापालिकेला ८६ हजार ३६४ रुपये शुल्क प्राप्त झाले आहे. महानगरपालिका क्षेत्रात फलक लावण्यासाठी नागरिक, संस्था, व्यवसायिक आस्थापना, राजकीय कार्यकर्त्यांनी रीतसर अर्ज करून व शुल्क भरून परवानगी घ्यावी. शहरात विनापरवाना फलक आढळल्यास दंडात्मक कारवाईसह गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशारा आयुक्त यशवंत डांगे यांनी दिला आहे.

# नय्यर विद्यालयाच्या हस्तलिखिताचे वार्षिक स्नेहसंमेलनात प्रकाशन

नगर – दुर्गादेवी अमरचंद नय्यर विद्या मंदिर व श्रीमान बिशंभरदास अमरचंद नय्यर माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वार्षिक पारितोषिक वितरण व स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी बनविलेल्या 'उमलत्या कळ्या' या हस्तलिखिताचे प्रकाशन करताना डॉ. राजेंद्र पवार यांच्या हस्ते झाले.



नय्यर विद्यालयाच्या हस्तलिखिताचे वार्षिक स्नेहसंमेलनात प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ उद्योजक लालूशेठ नय्यर, डॉ शरद मगर, संस्थेचे अध्यक्ष काकशेठ नय्यर, उपाध्यक्ष बाळासाहेब पवार, सचिव बापूराव आंधळे, दामोदर सातपुते, भास्कर गोरे, विनायक लिपाणे, अशोक बारस्कर, तान्हाजी काकड, दहातोंडे सर, महेंद्र सबलोक, हरिषशेठ नय्यर, मनेश नय्यर, हर्ष निखिल वारे, सुनील त्र्यंबके, नय्यर प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यपिका मंदा हांडे, माध्यमिकचे मुख्याध्यापक श्रीकृष्ण पवार, आदिनाथ घुगरकर, मंगल आंधळे, सुधाकर जाधव उपस्थित होते.

डॉ. शरद मगर म्हणाले की, एखाद्या व्यक्तीला आपण कोणत्या घरात, जातीत किंवा धर्मात जन्म घ्यावा, यापेक्षा स्वतःचे कार्य कसे असावे, हे आपल्या हातात असते. नय्यर कुटुंबाने या शाळेसाठी केलेले कार्य हे लाख मोलाचे आहे. सर्वच क्षेत्रांत आता मुली अग्रेसर असून मुले मागे पडताहेत. त्यामुळे आता बेटी बचाओ बेटी पढाओ पेक्षा बेटा पढाओ म्हणण्याची वेळ आली आहे. मुलांनी कुसंगत टाळून चांगल्या मुलांची संगत ठेवावी. मुलांनी चांगला व्यायाम, योगा, मैदानी खेळ खेळून आपले शरीर व मन सदृढ ठेवावे, मोबाईलपासून शक्य तेवढे दूर राहून चांगले स्वप्न ठेऊन चांगले प्रयत्न करावेत, असे सांगितले.

लालूशेठ नय्यर म्हणाले, शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांनी खेळाकडे आकर्षित व्हायला हवे. शाळा ही विद्यार्थी घडविण्याचे कार्य करते. विद्यार्थी घडविण्यात शिक्षक व पालकांबरोबर संस्थाचालक, शिक्षकेतर कर्मचारी यांचेही अपार कष्ट असतात, असे सांगितले.

मुख्याध्यापिका मंदा हांडे सेवानिवृत्त होत असल्याने संस्थेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. सांस्कृतिक कार्यक्रमाचे उदघाटन संस्थेच्या संचालिका जनाबाई पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उमाकांत फंड उपस्थित होते. सूत्रसंचालन पुष्पा म्हस्के, अनिल लाहंगे यांनी केले. आभार एकनाथ मोटे यांनी मानले. प्रास्तविक व परिचय श्रीकृष्ण पवार यांनी करून दिला, तर अहवाल वाचन मंदा हांडे यांनी केले.

## दुचाकीच्या धडकेत वृध्द गंभीर जखमी

नगर – अरणगावकडे जाण्यासाठी गाडीची वाट पाहत रस्त्याच्या कडेला उभे असलेल्या वृद्ध इसमास भरधाव वेगातील मोटरसायकलने धडक दिली. या धडकेत वृद्ध इसम जखमी झाला. ही घटना नगर पुणे रोडवरील कायनेटिक चौकातील सम्राट वडेवाला हॉटेल समोर सोमवारी (दि. २३) घडली.

वसंतराव नाईक (रा. वाळकी, ता.नगर) हे औषध उपचार करून अरणगाव कडे जाण्याकरिता वाहनाची वाट पाहत कायनेटिक चौकात उभे असताना भरधाव वेगातील मोटारसायकल ने त्यांना धडक दिली. या धडकेत त्यांच्या खुब्याला मार लागून ते जखमी झाले. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात श्रीराम वसंत नाईक यांनी दिलेले फिर्यादीवरून अज्ञात मोटारसायकल स्वाराविरुद्ध बी एन एस २०२३ चे कलम २८१, १२५ (अ) (ब) मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४ (अ)(ब) १७७ अन्वये गुन्ह्याची नोंद केली आहे.



सुरज जाधव आणि टोळीविरोधात कारवाईसाठी आंदोलनाचा इशारा देणारे निवेदन तोफखाना पोलिसांना देण्यासाठी गेलेले रामवाडीतील नागरिक.

# गृहिणी

## आरोग्य

### कोथिंबीरीचे पाणी प्या हेल्दी रहा

कोथिंबीरमध्ये असलेले नैसर्गिक गुणधर्म आतड्यांतील घाण साफ करण्यास मदत करतात. हे शरीर डिटॉक्सिफाय करते आणि पोटाचे आरोग्य सुधारते. शरीरातील विषारी घटक काढून टाकून त्वचा निरोगी बनवते. संसर्गाशी लढण्याची ताकद वाढवते. आपल्या दैनंदिन दिनचर्यामध्ये हे समाविष्ट करा आणि फक्त एका आठवड्यात फरक पहा.

## पाककला

### दही पालक सूप

**साहित्य :** एक कप बारीक चिरलेला पालक, एक कप फेटलेले दही, पाकळ्या चिरलेला लसूण, एक टीस्पून तूप, अर्धा टीस्पून जिरे, १/४ टीस्पून मीरे पूड, मीठ, एक कप पाणी, कोथिंबीर

**कृती :** सर्वात आधी एका कढईत तूप गरम करावे. आता जिरे घालून हलके परतून घ्यावे. त्यात चिरलेला लसूण घालून सोनेरी होईपर्यंत परतून घ्यावा. नंतर त्यात चिरलेला पालक घालावा. पालक २-३ मिनिटे परतवून घ्यावा. म्हणजे तो मऊ होईल. आता फेटलेले दही हळूहळू मिसळत असताना त्यात पालक घालावा. नंतर दही आणि पालकाच्या मिश्रणात पाणी घालून मंद आचेवर शिजवावे. चवीनुसार मीठ आणि मिरेपूड घालावी. नंतर ५-७ मिनिटे शिजू द्यावे. आता तयार सूप एका भांड्यात काढून कोथिंबिरीने गार्निश करावे.

## वास्तू

### पैशांचा ओघ वाढण्यासाठी

शुक्रवारी मनी प्लांटमध्ये लाल रंगाचा कलवा बांधा. तुमच्याकडे कलावा नसेल तर धागा बांधा. हे बांधणे अत्यंत शुभ मानले जाते. बांधल्यानंतर सुख, समृद्धी आणि सौभाग्यासाठी देवी लक्ष्मीची प्रार्थना करा. यामुळे पैशाशी संबंधित समस्या दूर होतील आणि हळूहळू पैशाचा ओघ वाढेल.

## सल्ला

तुळशीच्या रोपाभोवती नेहमीच स्वच्छता ठेवावी. शूज, चप्पल, घाणेरडे कपडे किंवा झाडू इत्यादी जवळ ठेवू नयेत.

## सौंदर्य

लिंबाच्या रसामध्ये सायट्रिक ॲसिड आढळते, जे त्वचेवरील डाग साफ करण्यास मदत करते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. २५ डिसेंबर २०२४

**ख्रिसमस, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, मार्गशीर्ष कृष्णपक्ष, चित्रा १५।२२, सूर्योदय ०६ वा. ३४ मि. सूर्यास्त ०६ वा. १० मि.**

## राशिभविष्य

**मेष :** दिवस अनुकूल असेल. आपले अडकेलेले कार्ये पूर्ण होतील. आनंदाची बातमी मिळेल.

**वृषभ :** नोकरदार व्यक्तींसाठी वातावरण अनुकूल राहील. आरोग्य देखील उत्तम राहील. कौटुंबिक सहयोग मिळेल.

**मिथुन :** वाहने काळजीपूर्वक चालवा. संतोषजनक स्थितीमुळे उत्साह वाढेल.

**कर्क :** व्यापारासाठी प्रवासाचे योग संभवतात. लेखन कार्यात यश मिळेल. अर्ज देण्यासाठी उत्तम वेळ.

**सिंह :** कामात किंचित अडचणी येतील पण धैर्यशील राहिल्याने कार्ये पूर्ण होतील. उल्हासाचा अनुभव येईल.

**कन्या :** मानसिक सुख-शांतीचे वातावरण राहील. आरोग्य उत्तम राहील. कौटुंबिक वातावरण उत्तम राहील.

**तूळ :** वरिष्ठांकडून कौतुक होईल. एखाद्या प्रोजेक्टसाठी विशेष प्रयत्न कराल.

**वृश्चिक :** येणारा काळ भूतकाळातील आनंद पुन्हा आणेल. मागील उधारी वसुल होईल. पत्नीसुख मिळेल.

**धनु :** वाहन चोरी होण्याची शक्यता आहे. भाऊबंद डोके वर काढतील. कार्यालयात विरोधक राजकारण खेळतील.

**मकर :** आज नवीन संबंध स्थापित करणे, माहितीची देवाण-घेवाण व मीटिंगच्या माध्यमातून शिकाल.

**कुंभ :** आरोग्य उत्मम राहिल. जुनी मित्र मंडळीत भेटतील.

**मीन :** अधिकारी वर्गाच्या हातात अडकलेले कामे पूर्ण होतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

शिक्षक - कोणता पक्षी सर्वात वेगवान धावतो.
विद्यार्थी - सर, हत्ती
शिक्षक - नालायका, काय करतात वडील तुझे?
विद्यार्थी - सर ते शार्प शुटर आहेत.
शिक्षक - शाब्बास, मुलांनो, लिहा सर्वात वेगवान धावणारा पक्षी, हत्ती.

# जागतिक आश्चर्ये

## आर्टेमिसचे मंदिर

*इफेसस् येथील मंदिर ज्याला आर्टेमिसचे मंदिर असे म्हणत असत. त्याचा विध्वंस इ.स.२६२ (ख्रिस्तोत्तर) काळात हिरोस्ट्रेटस् याने आक्रमण करुन केला होता. त्याचा या मागील उद्देश हा स्वत:ची प्रसिद्धी व किर्ती मिळवणे हा होता. म्हणून त्याच्या या कृतीमुळे 'हिरोस्ट्रॅटीक किर्ती' हे विधान प्रसिद्ध होत गेले.*

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७०७८ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ■ | ४ | ५ | | ६ |
| ■ | ७ | | | | | ■ | |
| ८ | | | ■ | | ■ | ९ | |
| १० | | ■ | ११ | | १२ | | ■ |
| १३ | | १४ | ■ | ■ | १५ | | |
| | ■ | १६ | १७ | | | ■ | ■ |
| ■ | १८ | | | ■ | १९ | २० | २१ |
| २२ | | | ■ | २३ | | | |

**आडवे शब्द :** १) भव; संसार ४) वृत्तपत्राचा मुख्य जबाबदार लेखक ७) एकाम ागून एकाला पकडण्याची पोलिसांची कारवाई ८) भाट; स्तुतिपाठक ९) श्वासोच्छ्वास करण्याचे इंद्रिय १०) मिठी; आलिंगन ११) एक आंबटगोड फळ १३) दगडाचे काम करणारा एक समाज १५) कागदाचा चतुर्थांश स्तंभ १६) एकसारखे लक्ष लावून; चकितपणाने १८) उत्तराधिकारी; हक्कदार १९) पुष्प; फूल २२) अरिष्ट; आपत्ती; बलामत २३) शासन; गव्हर्नमेंट

**उभे शब्द :-** २) पंधरा दिवसांचा समूह; पक्ष ३) पाय; पद ४) गोळा करणे; जमविणे ५) झाडावर पिकलेले फळ ६) सुवर्ण; कांचन; सोने ८) एक पालेभाजी ९) नासलेला १२) कृष्णाने मारलेला एक राक्षस १४) भात शिजताना होणारा आवाज १७) परीक्षा; सत्त्व; चाचणी १८) धागा; तंतू; दोरा २०) एक धान्य २१) कोणत्याही प्राण्यातील पुरुष जात

### शब्दगंध क्र. ७०७७ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सं | सा | र | ■ | रा | म | रा | म |
| ता | रा | म | ती | ■ | न | ■ | ह |
| प | सा | ■ | न | व | न | व | ती |
| ■ | र | ■ | ते | ल | ■ | डा | ■ |
| सं | ■ | ना | रा | य | ण | ■ | आ |
| प्र | भा | व | ■ | ■ | ■ | बा | ग |
| दा | ■ | ड | ळ | म | ळी | त | ■ |
| व | ■ | ती | ■ | स्त | ■ | मी | न |

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** धैर्याने वाट पाहणाऱ्यांना अखेर यशाची साथ मिळते.

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## समुद्राचे पाणी खारट का?

'वॉटर वॉटर एव्हरीवेअर अँड, नॉट अ ड्रॉप टू ड्रिंक!' हे सुप्रसिद्ध वचन सर्वांनी एकलंच असेल. याचे कारण असे की, सागराचे पाणी इतके खारट असते की ते आपण पिऊ शकत नाही. पाणी खारट आहे म्हणजे त्यात क्षार असणार हे उघडच होते. सागरी पाण्यात ३।। ते ४% क्षार असतात. नदीच्या मुखाजवळ हे प्रमाण कमी होते तर ज्या समुद्रातून पाणी बाहेरच्या सागरी पाण्याशी मिसळायला फारसा वाव नसतो, तिथे हे प्रमाण फार वाढते. तांबडा समुद्र, मृत समुद्र, कास्पियन समुद्र यांत हे क्षारांचे प्रमाण अतिशय जास्त आहे. मृत समुद्रात जर एखाद्या माणसाने उडी मारली तर तो त्या क्षारयुक्त पाण्यावर विनासायास तरंगतो. हे क्षार समुद्रात येतात कुठून? या प्रश्नाचे उत्तर फारच सोपे आहे. समुद्रास नद्या येऊन मिळत असतात. या नद्या येताना खडकांवरून वाहतात. पाण्याच्या प्रवाहाने या खडकांची झीज होते. हे खडकांना झिजवणारे पाणी खडकातल्या खनिजांची झीज, गाळ, माती या स्वरूपात वाहून नेते. यातच निरनिराळे क्षार असतात. सागरात हे क्षार सतत पडले तरी सागरातले पाणी मात्र वाढत नाही. कारण सागराच्या पाण्याची वाफ होऊन त्याचे ढग बनतात नि पाऊस पडतो. या चक्रात पाणी तेच असते फक्त क्षार नव्याने येतात. म्हणून तर सागराचे पाणी खारट. मुंबईहून पश्चिम रेल्वेने प्रवास करताना रेल्वे रस्त्याच्या पश्चिमेला सागर तटावर मिठागरे दिसतात. हे मीठ सागरी क्षारयुक्त पाणी वाळवून तयार झालेले असते.


## संस्कार

एका गावामध्ये एक प्रामाणिक मुलगा राहत होता. त्याच्या आई वडिलांनी त्याच्यावर खूप चांगले संस्कार केले होते. तो त्या संस्कारांना धरून वागत होता. तो एकदा शेजारच्या घरी काहीतरी कमा निमित गेला. घरी कोणी नव्हते फक्त नोकर होता. नोकराने त्याला बसायला सांगितले आणि नोकर भाजी आणण्यासाठी गेला. मुलगा तेथेच बसून राहिला. त्याच्या समोर एका टोपलीत सफरचंद ठेवलेले होते. त्याला सफरचंद खूप आवडायचे परंतु त्याने त्याला हात न लावता तो शेजाऱ्यांची वाट पाहत बसला होता. बऱ्याच वेळाने शेजारी घरी परत आला त्याने पाहिले की मुलगा वाट बघत बसला आहे व त्याच्या शेजारी सफरचंदे असतानाही तो त्यांना खात नाही. त्या मुलालाही सफरचंद आवडत हे त्यांना माहीत होते तरी त्याने त्यांना हात लावला नाही.

शेजारी आले की त्याने त्यांना नमस्कार केला. शेजाऱ्यांनी त्याला विचारले, तुला सफरचंद आवडतात ना, मग तरी तू एक ही सफरचंद का खाल्ले नाहीस मुलगा म्हणाला, इथेच कोणीच नव्हते, मी एक दोन सफरचंदे जरी खाले असती तरी कुणालाच काही कळले नसते, मला कोणीच पाहत नव्हते पण मी स्वत:ला पाहात होतो. म्हणून मी खल्ले नाही मी स्वत:ला फसवू शकत नाही. शेजाऱ्याला त्याचे बोलणे ऐकून आनंद झाला. तो म्हणाला, आपला आत्मा आपण काय करतो ते पाहात असतो, आपण आपल्या आत्म्याला कधीच फसवू शकत नाही. दुसऱ्याला फसवू पण आपण आत्म्याला खोटे बोलयाचे फार अवघड आहे.

तात्पर्य : लहान वयातच आई-वडीलांनी योग्य संस्कार केल्यास ते आयुष्यभर राहतात.

# रहमते दर्शन (भाग - १)



० नवम्बर, १९८४ को जब मैं बैंक से १५,०००/- रु. निकलवा कर अपने आफिस जा रहा था, तो रास्ते में धोखे से किसी ने मेरी विक्री के बक्से से रुपये वाला बैग निकाल लिया। यह रुपये मैं अपने आफिस क कर्मचारियों की तनख्वाह के लिए निकाल कर लाया था। रुपया गुम होने से मुझे बहुत परेशानी का सामना करना पड़ा। मैंने दयाल पुरुष संत दर्शनसिंह जी महाराज से पैसा गुम होने के बारे में अर्ज़ की । महाराज जी ने मेरी बात बहुत ध्यान से सुनी और फ़रमाया, रुपया निकालते समय आप को ड्शलीीळॢ र्ग्रीव (सुरक्षा कर्मी) साथ लेकर जाना चाहिये था। मैंने जवाब दिया, महाराज जी, हमें ड्शलीीळॢ र्ग्रीव नहीं मिले हैं। दयाल पुरुष ने सारी बात हुज़ूर पर छोड़ दी। महकमे की तरफ से जाँच हुई और दो वर्ष तक चली, जिसमें महाराज जी की दया मेहर से मेरी नौकरी पर कोई आँच नहीं आई क्योंकि बीमा कंपनी ने १५०००/- रु. मेरे महकमे को अदा कर दिये थे। ऐसा केस हमारे महकमे में पहली बार हुआ था।

## सच्चे सहाय्यक

दयाल पुरुष संत दर्शनसिंह जी महाराज की दया मेहर की एक और बात है जिसका मैं ज़िक्र करना ज़रूरी समझता हूँ। मेरा बड़ा भाई रत्न लाल, करोलबाग शादी पर गया और वहाँ से आकर ठंड के कारण इतना बीमार हो गया कि उसे गुरु तेग बहादुर अस्पताल में दाखिल कराना पड़ा। उन्हें ईीरळप षर्शींशी (सरसाम) हो गया था और बिल्कुल होश नहीं आ रहा था। डॉक्टरों ने कहा कि यह दो दिन बेहोश रहा है, अगर तीसरे दिन भी होश में नहीं आया तो इसका बचना मुश्किल हो जायेगा। उसी समय, महाराज कृपालसिंह जी का जन्मदिन ६ फ़रवरी १९८९ को कृपाल आश्रम में मनाया जा रहा था। मुझे संत दर्शनसिंह जी महाराज को सुबह १ बजे के करीब अपने भाई की हालत के बारे में कहने का मौका मिला। महाराज जी ने अपने हाथों से मुझे प्रसाद दिया और बाद में प्रसाद का विषय लेकर सत्संग फ़रमाया। महाराज जी ने कहा कि प्रसाद का मतलब खुशी है। जब मैं सुबह अपने घर पहुँचा तो मुझे ख़बर मिली कि मेरे भाई को सुबह होश आ गया था। यह सुनकर हमें बहुत राहत मिली। हमने कोटि-कोटि बार महाराज जी का शुक्राना किया। इसमें कोई शक नहीं कि महाराज जी की दया मेहर का अदृश्य हाथ जीव की समुद्र के अन्दर, पहाड़ों पर, जंगलों में, आसमान में और सूक्ष्म आंतरिक रूहानी मंडलों में पल-पल रक्षा करता है।

## कृपासिंधु

मुझे संत कृपालसिंह जी महाराज से नामदान की दात मिली या यूँ कहिये कि मुझमें नाम का बीजारोपण संत कृपालसिंह जी महाराज ने किया। मुझ पर संत दर्शनसिंह जी महाराज की मेहरबानियों की कई घटनायें घटीं, जो इस प्रकार से हैं। एक बार मेरी बेटी, जिसकी आयु ६-७ वर्ष रही होगी, बीमार हो गई। बहुत उपचार कराया परन्तु कोई लाभ नहीं हुआ। बीमारी कुछ ऐसी थी कि डॉक्टरों ने एक मीटिंग में यह निर्णय किया कि बच्ची का ऑपरेशन किया जाये। जब हमें ऑपरेशन के बारे में पता चला तो हम घबरा गये।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

जब तक आप की नींद पूरी नहीं होगी आप अपनी शुगर को नियन्त्रित नहीं कर पाएंगे और न ही इससे घटने बढ़ने से रोक पाएंगे। जब नींद से जुड़ी परेशानियां ठीक हो जाती हैं तो तीन महीने इन्सुलिन प्रतिरोध बेहतर हो जाता है।

दिमाग और निंद्रा रोग

अगर ५ घंटे गहरी नींद आ जाए तो शरीर रेलेक्स हो जाता १ कच्ची नींद ८ घंटे की हो तब भी शरीर रेलेक्स नहीं होता, थका थका सा लगता है। तनाव और निराशा की वजह से गहरी नींद नहीं आती। शरीर में दर्द भी नींद की कमी से होता है। लोग सोने का समय फिक्स नहीं करते कभी १० तो कभी ११ या जब मन आया सो गये इस से गहरी नींद नहीं आती। दिन में २० मिनट से ज्यादा नहीं सोना चाहिए। सोने से पहले १५-२० मिनट सकारात्मक सोच पर बुक रीडिंग की आदत डालने से अच्छी नींद आती है। टी.वी. देखते देखते सोयेंगे तो नींद ठीक नहीं आएगी। अनिद्रा के तनाव को हम सभी कभी न कभी झेलते हैं। किसी के साथ कड़वाहट, कोई दुर्घटना जैसी बहुत सी चीजे हमें रात में जगाए रखती हैं। खून में चीनी की मात्र ज्यादा होने से भी नींद अच्छी नहीं आती। इसलिए सोने से २-३ घंटे पहले चीनी की कोई चीज नहीं खानी चाहिए। चीनी नशे की लत की तरह है जो आप के शरीर के हर अंग पर नेगेटिव असर करने लगती है। अतिरिक्त चीनी से डायबिटीज होने का डर भी रहता है। अल्कोहल की तरह अधिक चीनी लीवर के लिये भी नुकसानदायी होती है। ज्यादा चीनी से हृदय रोग, इमूयन सिस्टम कमजोर हो जाता है, हड्डियों में कमजोरी आ जाती है, त्वचा को नुकसान होता है तथा दांतो के रोग लग जाते हैं।

## दिमाग की शक्ती

कई व्यक्तियों को कभी भी नींद आ जाती है। बेशक वह किसी से बात कर रहे हों, गाड़ी चला रहे हों, खाना बना रहे हों, खाना खा रहे हों, उन्हें नींद आ जाती है। यह एक रोग है। दिमाग का वह भाग है जो निंद्रा को नियन्त्रित करता है, जब कमजोर हो जाता है तो नींद पर नियन्त्रण नहीं रख पाता तब यह रोग लग जाता हैं। कई बार हमें तीव्र मानसिक आवेगों का सामना करना पड़ता है, जिस से मानसिक शांति नष्ट हो जाती है और हमें ज्यादा नींद आने लगती है। कई लोग बहुत जोर जोर से हंसते है और अत्यधिक आनन्द महसूस करते हैं, अत्यधिक गुस्से में आ जाते हैं, अति उत्साह में आ जाते हैं, बहुत खुशी में आ जाते हैं, जब कभी कोई लाटरी आदि निकल आये या अति दुखी हो जाते हैं, जैसे किसी प्रिय की अचानक मृत्यु हो जाए। ऐसी दशा में नींद को नियन्त्रित करने वाली मांसपेशियां प्रभावित हो जाती हैं, जिस से हमें निंद्रा रोग हो जाता है।

नींद से हमारे मस्तिष्क में हाइपोक्रेटिन नाम का एक रसायन बनता है। यह रसायन सोने और जागने की प्रक्रिया को नियन्त्रित करता है। जब यह रसायन कम पैदा होता है तो हमें निंद्रा रोग हो जाता है। इस रसायन की कमी वाला व्यक्ति अगले ही पल नींद लेने के लिये बाध्य हो जाता है या सोया हुआ व्यक्ति अचानक जाग जाता है।

नींद के रूटीन का पालन करें, दिन में कुछ देर आराम करें, व्यायाम करें, नशीले पदार्थों और निराशा तथा लड़ाई झगड़े से बच कर रहने से, निंद्रा रोग से मुक्ति पा सकते हैं। डाक्टर से दवाई भी ले सकते हैं। अगर नींद का अनुभव कर रहे हैं तो गाड़ी न चलायें, चलानी ही पड़े तो बहुत धीरे धीरे चलायें और भीड़भाड़ वाले रास्ते से न जाएं। अगर बहुत नींद आ रही है तो गाड़ी को थोडी देर रोक कर झपकी ले लेवें। तनाव, कार्य का दबाव, अवसाद, घबराहट, किसी शारीरिक रोग, हृदय रोग, दमा रोग, केंसर का रोग, एलेर्जी, एसिडिटी, मधुमेह के कारण अधिक शुगर बढ़ने पर तथा रक्तचाप के कम या ज्यादा होने पर भी अनिद्रा रोग हो जाता है।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

**गुडघ्यांचे व्यायाम :** पाठीवर उताणे झोपावे. नंतर दोन्ही गुडघ्यांचे स्नायू वर खेचावे. नंतर परत सोडावे. असे पाच वेळा करावे. तसेच पाय वर उचलून सायकल चालविल्याप्रमाणे करावे यामुळे गुडघ्याच्या ठिकाणी रक्ताभिसरण वाढते. गुडघ्यांचे स्नायू लवचीक व मजबूत होतात; त्यामुळे गर्भावस्थेमध्ये वजन वाढल्याने होणारी गुडघेदुखी टाळता येते.

**७) तळव्यांचे व्यायाम :**

पायाचे पंजे डावीकडून उजवीकडे व उजवीकडून डावीकडे असे पाच वेळा गोलाकार फिरवावे.

**योगासने :**

**१) उग्रासन : कृती-**

आपले दोन्ही पाय एकमेकांपासून जास्तीत - जास्त लांब पसरून ठेवावेत. त्यानंतर दोन्ही हातांचा जमत असेल तर पाठीवर नमस्कार करावा. वेळ - १ ते २ मिनिटे करावे.

**२) सुलभ भद्रासन : कृती -** प्रथम ताठ बसावे व दोन्ही पायांचे घोटे योनीजवळ आणावेत. दोन्ही

## व्यायामाचे प्रकार

हात गुडघ्यावर ठेवावेत. हात गुडघ्यावर ठेवल्यानंतर दोन्ही गुडघे जमिनीवर दाबण्याचा प्रयत्न करावा. वेळ - अर्धा ते १ मिनिट करावे. फायदा - आयुर्वेदानुसार या भागातील मूलाधारचक्र क्रियाशील होते. त्याचप्रमाणे मांड्या, कंबरेचा भाग यांतील स्नायू मजबूत व लवचीक झाल्याने सुलभ नैसर्गिक प्रसूतीसाठी याचा उपयोग होतो.

**३) बटरफ्लाय : कृती -**

सूलभ भद्रासन केल्यानंतर थोडी विश्रामावस्था घेऊन परत दोन्ही पायांचे घोटे हातांनी घट्ट पकडावीत व दोन्ही पाय फुलपाखराप्रमाणे खाली व वर करावेत. वेळ - अर्धा ते १ मिनिट करावे. **फायदा :** कंबर, नितंब, मांड्या, पाय यांमधील स्नायू हे लवचीक व मजबूत होतात. तेथील रक्तप्रवाह सुधारल्याने हे अवयव बलवर्धक होतात. नैसर्गिक प्रसूतीच्या वेळेला हे अवयव मजबूत, लवचीक असणे आवश्यक असते; त्यामुळे गर्भवतींमध्ये कळा सहन करण्याची क्षमता वाढते.

**४) उकिडवे बसणे :**

**कृती -**

गर्भावस्थेच्या पहिल्या तीन महिन्यांपर्यंत हे आसन बसून करावे. नंतरच्या काळात मात्र खिडकीला धरून किंवा भिंतीचा आधार घेऊन आपण खुर्चीवर बसत आहोत अशी कल्पना करून हे आसन करावे. उकिडवे बसून दोन्ही हात खांद्याच्या रेषेत समोर ठेवावेत. भारतीय पध्दतीचे शौचालय वापरल्यास हे आसन आपोआपच घडले जाते. वेळ - अर्धा ते १ मिनिट करावे. फायदे - नितंब, मांड्या, गुडघे, पोटऱ्याचे स्नायू मजबूत होतात; त्यामुळे नैसर्गिक, सुलभ प्रसूतीसाठी याचा उपयोग होतो.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# शाळेतील अनेक गुणी विद्यार्थी रंगकर्मी म्हणून नावारूपास आल्याचा अभिमान

**छायाताई फिरोदिया यांचे प्रतिपादन; भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलमधील नूतनीकृत डॉ.मोने कला मंदिराचे उद्घाटन**

नगर – अहमदनगर एज्युकेशन सोसायटीला उच्च गुणवत्तेची मोठी परंपरा आहे. यात सर्व मुख्याध्यापक, शिक्षकांचा मोलाचा वाटा आहे. संस्थेच्या निर्णयाची तत्परतेने व प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षक नेहमीच अग्रेसर असतात. शिक्षकांमुळेच खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांच्या आयुष्याला आकार येतो. यात शिक्षकांचा आपल्या पेशाविषयीचा प्रामाणिकपणा महत्वाचा असतो. असे चांगले शिक्षक संस्थेला कायम मिळाले आहे. आज शाळेतील ऐतिहासिक डॉ.मोने कला मंदिर नवीन रूपात सर्वांसाठी खुले झाले आहे. याच मंचावर कलागुण सादर करणारे अनेक माजी विद्यार्थी रंगकर्मी म्हणून नावारूपास आले याचा अभिमान वाटतो. आता शाळेतील विद्यार्थ्यांबरोबरच नगरकरांसाठी मोने कला मंदिर दर शनिवार व रविवारी सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी उपलब्ध असणार आहे. यावर्षी शाळेचे स्नेहसंमेलन याच मंचावर अतिशय उत्साहात साजरे झाले याचा विशेष आनंद वाटतो, असे प्रतिपादन अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांनी केले.

अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलमधील डॉ.मोने कला मंदिराचे नूतनीकरण करण्यात आले आहे. या नूतनीकृत कला मंदिरचे उद्घाटन नगरमधील ज्येष्ठ रंगकर्मींच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, ज्येष्ठ रंगकर्मी तथा भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष पी. डी. कुलकर्णी, नाट्य परिषदेच्या नगर शाखेचे अध्यक्ष अमोल खोले, उपनगर शाखेचे अध्यक्ष प्रा.प्रसाद बेडकर, ज्येष्ठ पत्रकार भूषण देशमुख, श्रीराम जोशी, संस्थेचे गौरव फिरोदिया, आशाताई फिरोदिया, सुनंदाताई भालेराव, भूषण भंडारी, संजय बोरा, पुष्पाताई फिरोदिया, ॲड.गौरव मिरीकर, हेमंत मुथा, कुलकर्णी ज्ञानेश, गौरी जोशी डॉ. विजय जोशी आदींसह संस्थेच्या सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक उपस्थित होते.



भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलमधील नूतनीकृत डॉ.मोने कला मंदिराचे उद्घाटन करण्यात आले.

नूतनीकरणाच्या कामात योगदान देणारे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे साउंड रेकॉर्डीस्ट कामोद खराडे, अभियंता अभिजीत क्षीरसागर यांच्यासह इतरांचा विशेष सत्कार करण्यात आला.

ज्येष्ठ रंगकर्मी पी. डी. कुलकर्णी म्हणाले, १९५५ मध्ये स्थापन झालेल्या मोने कला मंदिराचा संपूर्ण कायापालट पाहून आनंद होत आहे. याठिकाणी आता अद्ययावत रंगमंच, ध्वनी व्यवस्था, प्रकाश व्यवस्था उपलब्ध झाली आहे. माजी विद्यार्थी म्हणून याच मोने कला मंदिराच्या मंचावर कलेचा पाया रचला गेला. या मंचावर एकांकिका, नाटकांची तालीम केली. अनेक एकांकिका सादर करण्याची संधी मिळाली. मनात या मंचाबद्दल कायम हळवा कोपरा आहे. आज या नवीन रूपातील अद्ययावत डॉ.मोने कला मंदिराचे उद्घाटन करण्याची संधी मिळाली हा सर्वोच्च आनंदाचा क्षण आहे.

अमोल खोले म्हणाले, नगरकरांनी नेहमीच कलेला आणि कलाकारांना प्रोत्साहन दिले आहे. भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल–मधून अनेक दिग्गज कलाकार घडले आहेत. येथील अद्ययावत मोने कला मंदिर नगरच्या सांस्कृतिक वैभवात भर घालणारे ठरेल असा विश्वास वाटतो. प्रसाद बेडेकर यांनी यावेळी हरी गौरव फिरोदिया यांचे विशेष कौतुक करताना असे सांगितलं की ही वास्तू नूतनीकृत होत असताना श्रीयुत गौरव फिरोदिया यांनी घेतलेले परिश्रम आणि वेळोवेळी आम्हा रंगकर्मीशी साधलेला संवाद यामुळे आज ही अद्ययावत वास्तू उभी राहण्यास मोठी मदत झाली आहे. मुळात हे जुनी वास्तू अद्यावत करून नगर मधील कलाकारांसाठी एक व्यासपीठ निर्माण करून द्यावं ही संकल्पनाच प्रेरणादायी असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. स्वप्नील मुनोत म्हणाले, शालेय दशेत नाटक, अभिनयाचा गोडी लावण्याचे काम शाळेतील शिक्षकांनी केले. आयुष्यात याच मंचावरून अभिनय क्षेत्रात पदार्पण करण्याची संधी मिळाली. तेव्हाच्या आठवणी आजही मनात कायम आहे. संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांच्यासह संपूर्ण फिरोदिया कुटुंबियांनी संस्थेतील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना नेहमीच प्रोत्साहन दिले आहे. आता मोने कला मंदिर सर्वांसाठीच उपलब्ध झाल्याने अनेक गुणी कलाकार या मंचाव्दारे घडतील असा विश्वास वाटतो.

# रात्रशाळेतील १०वी च्या विद्यार्थ्यांना नवनीत अपेक्षित प्रश्नसंचाचे वाटप

**मासूम संस्थेचा भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये उपक्रम**

नगर – हिंद सेवा मंडळाच्या भाई सथ्था नाईट हायस्कूलमधील इयत्ता १० वी बोर्डाच्या परीक्षेतील सर्व विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी मुंबईच्या मासूम संस्थेमार्फत नवनीत २१ अपेक्षितचे प्रश्नसंचाचे वाटप करण्यात आले. दिवसा अर्थाजन करुन रात्री शिक्षण घेणाऱ्या शहरातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला.

हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष शिरीष मोडक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, रात्रशाळेचे चेअरमन डॉ. पारस कोठारी, रात्रशाळेचे प्राचार्य सुनील सुसरे, नवनीतचे संजय पाठक आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व रात्रशाळेचे विद्यार्थी उपस्थित होते.



मासूम संस्थेच्यावतीने भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी नवनीत अपेक्षित प्रश्नसंचाचे वाटप करण्यात आले.

प्रास्ताविकात डॉ. पारस कोठारी यांनी रात्रशाळेचा वाढता गुणवत्ता आलेख सादर करुन यावर्षी देखील विद्यार्थी कष्ट व मेहनतीच्या जोरावर चांगले यश मिळवणार असल्याची आशा व्यक्त केली. विद्यार्थी दिवसा कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी कष्ट करुन रात्री शिक्षण घेताना त्यांना नवनीत २१ अपेक्षित उपयोगी येणार असल्याचे स्पष्ट केले.

शिरीष मोडक म्हणाले की, जीवनात पुढे जाण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही. शिक्षणासाठी वेळ काढावा लागतो. यशाला कारणे नव्हे, तर अपार कष्ट लागतात. रात्रशाळेत विविध सोयी–सुविधा मिळताना त्याचा योग्य उपयोग करुन जीवनाचे ध्येय गाठण्याचे त्यांनी आवाहन केले.

अजित बोरा यांनी रात्रशाळेतील विद्यार्थ्यांची शिकण्याची असलेली जिद्द प्रेरणादायी आहे. त्यांनी मिळवलेले यश हे इतरांपेक्षा श्रेष्ठ असून, त्यांच्या शिक्षणासाठी संस्था पाठिशी असल्याचे सांगितले. नवनीत प्रकाशनचे संजय पाठक यांनी नवनीत स्टडी पार्क या योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती व बक्षीस योजनेची माहिती दिली.

रोटरी क्लबचा राष्ट्रीय शिल्पकार पुरस्कार मिळाल्याबद्दल व हिंद सेवा मंडळाच्या सेवकांची सहकारी पतपेढीच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल रात्रशाळेचे शिक्षक महादेव राऊत यांचा सत्कार करण्यात आला व शाळेतील शिक्षिका अनुराधा दरेकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या दरवर्षी रात्रशाळेत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमास मासूम संस्थेच्या संचालिका निकिता केतकर, संचालक कमलाकर माने व युवराज बोऱ्हाडे वरिष्ठ व्यवस्थापक गुरुप्रसाद पाटील, एस.एस.सी. विभाग प्रमुख शशिकांत गवस, निलेश ठोंबरे व रात्रशाळेत वर्षभर राबविल्या जाणाऱ्या उपक्रमास बजाज फिनसर्व्ह कंपनीचे सहकार्य मिळत आहे त्याबद्दल संस्थेच्या वतीने आभार मानण्यात आले.

संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड. अनंत फडणीस, मानद सचिव संजय जोशी, ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा व सर्व सदस्यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. पाहुण्यांचा परिचय वैशाली दुराफे यांनी करून दिला. स्वागत प्राचार्य सुनील सुसरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस.एस. शिंदे यांनी केले. आभार अमोल कदम यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गजेंद्र गाडगीळ, उज्वला साठे, बाळू गोरडे, वृषाली साताळकर, संदेश पिपाडा, शरद पवार, कैलास करांडे, प्रशांत शिंदे, अशोक शिंदे, स्वाती होले, अनिरुद्ध देशमुख, अनिरुद्ध कुलकर्णी, अविनाश गवळी, मनोज कोंडेकर, कैलास बालटे आदींनी परिश्रम घेतले.

# ध्यानाने मनात जीवन जगण्याबद्दल सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होतो

**कृष्णा पेंडम यांचे प्रतिपादन; जागतिक ध्यान दिनानिमित्त जिल्हा कारागृहात ध्यानाचे धडे**

नगर – सुधारणा व पुनर्वसन हे कारागृह विभागाचे ब्रिद वाक्य असुन ध्यानाने मनात जीवन जगण्याबद्दल सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होतो तसेच ध्यानाची प्रक्रिया आपले शरिर, मन आणि त्याच्याही पलीकडे असलेल्या आपल्या अस्तित्वाच्या स्तरांना प्रभावित करण्याच्या उद्देशाने कारागृह प्रशासनामार्फत बंद्यासाठी राबविण्यात येणारे उपक्रम कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन कृष्ण पेंडम यांनी केले.



जिल्हा कारागृहातील बंद्यासाठी आर्ट ऑफ लिव्हिंग केंद्रातर्फे श्री श्री रविशंकरजी यांचे प्रेरणेने ध्यान सत्र आयोजित करण्यात आले.

जागतिक ध्यान दिनाचे औचित्य साधुन जिल्हा कारागृहातील बंद्यासाठी आर्ट ऑफ लिव्हिंग केंद्र, अहिल्यानगर संस्थेमार्फत अध्यात्मिक गुरू श्री श्री रविशंकरजी यांचे प्रेरणेने ध्यान सत्र आयोजित करण्यात आले. ध्यान सत्राच्या माध्यमातुन बंद्याच्या मानसिक आरोग्यावर सकारात्मक परिणाम होण्यास तसेच त्यांना तणावमुक्त जीवणाकडे प्रभुत्व करण्यास मदत होईल. या ध्यान सत्रात प्रशिक्षक कृष्णा पेंडम आणि स्वयंसेवक गणेश क्षीरसागर, शिवअमृत सलगरे यांनी मार्गदर्शन केले.

उपक्रम प्रशांत बुरडे (भा.पो.से) अपर पोलीस महासंचालक व महानिरिक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे–०१ व डॉ. जालिंदर सुपेकर (भा.पो.से) विशेष पोलीस महानिरिक्षक (कारागृह) महाराष्ट्र राज्य, पुणे–०१ यांचे संकल्पनेतुन व मार्गदर्शनखाली राबविण्यात आला आहे.

उपक्रमाचे यशस्वी नियोजनासाठी संतोष कवार तुरुंगाधिकारी श्रेणी–१ तथा प्र.अधीक्षक, सुनिल वानखेडे तुरुंगाधिकारी श्रेणी–२, सुभेदार हिराचंद ओंबासे, हवा. सुनिल विधाते, सुरेश जठार, यांनी कामकाज पाहीले.

# पेंमराज सारडा महाविद्यालयात पार पडल्या विद्यापीठ आंतरविभागीय मल्लखांब स्पर्धा

**जिल्ह्यातील विविध विद्यालयांचा सहभाग**

नगर – सारडा महाविद्यालयात पुणे विद्यापीठ अंतर्गत आंतर विभागीय मल्लखांब व रोप मल्लखांब स्पर्धा नुकत्याच महाविद्यालयाच्या प्रांगणात उत्साहात संपन्न झाल्या. स्पर्धांचे उद्घाटन हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष ॲड.अनंत फडणीस यांच्या हस्ते झाले. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन सुमतीलाल कोठारी, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित, प्रबंधक अशोक असेरी, पुणे विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव शिवाजी उतेकर, माजी उप कुलसचिव मनोहर कुंजीर, महाविद्यालयाचे क्रीडा प्रशिक्षक संजय धोपावकर व प्रा.संजय साठे आदींसह सहभागी जिल्ह्यांचे व्यवस्थापक, खेळाडू विद्यार्थी उपस्थित होते.



सारडा महाविद्यालयात पार पडलेल्या विद्यापीठ आंतरविभागीय मल्लखांब स्पर्धेत सहभागी स्पर्धक.

उद्घाटनाप्रसंगी अनंत फडणीस म्हणाले, सारडा महाविद्यालयाचा आणि मल्लखांब यांचे खूप जुने नाते आहे. गेल्या ५० वर्षांपासून नगर शहरात मल्लखांब हा खेळ रुजवण्यात पेमराज सारडा महाविद्यालयाचे खूप मोठे योगदान आहे, याचा आम्हाला अभिमान आहे. स्पर्धेस पुणे विद्यापीठ मॅनेजमेंट कौन्सिलचे सिनेट सदस्य प्रा. संदीप पालवे यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविकात प्रा.संजय धोपावकर यांनी सारडा महाविद्यालयाचा क्रीडा क्षेत्रातील कामगिरीची माहित दिली. प्रा.अक्षय कर्डिले यांनी आभार मानले.

सदर स्पर्धा यशस्वी करण्यासाठी माजी खेळाडू अनिकेत सुसरे, उमेश झोटिंग, शुभम शिंगटे, चंद्रशेखर चवंडके, प्राजक्ता दळवी, नंदू मगर यांचे सहकार्य लाभले. तसेच राजेश भालसिंग, होनाजी गोडळकर, नंदेश शिंदे, गणेश वाळुंजकर, निलेश कुलकर्णी, प्रणिता तरोटे, श्री. धोत्रे या माजी खेळाडूंनी स्पर्धेला भेट दिली.

# अयोध्यानगर पंचवटी परिसराचा विकासकामातून कायापालट करणार

**संपत बारस्कर यांचे प्रतिपादन; रस्ता कॉंक्रिटीकरण व ओपन स्पेस सुशोभीकरण कामाचे भूमिपूजन**

नगर – शहरातील प्रभाग क्रमांक १ च्या विकास कामांसाठी महापालिका व आ. संग्राम जगताप यांच्या माध्यमातून मोठा निधी उपलब्ध करून दिला असल्यामुळे प्रभागातील टप्प्याटप्प्याने विकासाची कामे मार्गी लागत आहे, अयोध्या नगर पंचवटी परिसरातील ओपन स्पेस व रस्ता कॉंक्रिटीकरणाची कामे हत्ती घेतली असून लवकरच ती पूर्ण होणार आहे या भागाचा विकास कामातून कायापालट होऊन नंदनवन होईल, नागरिकांनी देखील आपल्या घरातील कचरा घंटागाडीतच टाकून आपला परिसर स्वच्छ, सुंदर ठेवावा. प्रभागातील नागरिकांना आपल्या आवडीचे मोफत वृक्ष दिले जाईल, मात्र त्याचे संवर्धन करण्याचे काम करावे, नागरिकांच्या सहकार्यातूनच प्रभागांमध्ये कायमस्वरूपीची विकास कामे मार्गी लागत असल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी केले.



पाईपलाईन रोड अयोध्या नगर पंचवटी येथे रस्ता कॉंक्रिटीकरण व ओपन स्पेस जागेच्या सुशोभीकरण कामाचे भूमिपूजन करताना राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, माजी नगरसेवक डॉ.सागर बोरुडे, माजी नगरसेविका मीना चव्हाण, तुषार यादव, बाळासाहेब सांगळे, गौरव कराडे, शिरीष कुलकर्णी, चंद्रकांत भोंगे यांच्या सह नागरिक. (छाया – लहू दळवी)

पाईपलाईन रोड अयोध्या नगर पंचवटी येथे रस्ता कॉंक्रिटीकरण व ओपन स्पेस जागेच्या सुशोभीकरण कामाचे भूमिपूजन झाले. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, नगरसेविका मीना चव्हाण, तुषार यादव, बाळासाहेब सांगळे, गौरव कराडे, शिरीष कुलकर्णी, चंद्रकांत भोंगे, मनोहर जपकर, अभिजीत जोशी, संतोष देशपांडे, धनंजय शिंदे, सुमित देवकर, रावसाहेब तागड, अभिजीत अष्टेकर, अश्विनी सांगळे, शोभा कोरडे, सुनिता शिंदे, वनिता नाळके, स्वाती रागराणे, सुनंदा मेटे, राजश्री सुंकी, अश्विनी बत्तीन, लक्ष्मी शेडाळे, नम्रता परदेशी, मंगल देवघाणे आदीसह नागरिक उपस्थित होते

डॉ. सागर बोरुडे म्हणाले की, प्रभागातील मूलभूत प्रश्नांपासून विकासाची कामे नियोजनबद्ध कायमस्वरूपी मार्गे लावली आहेत, त्यामुळे पुन्हा पुन्हा काम करण्याची गरज भासत नाही, आता प्रभागातील सुशोभीकरण करण्याची कामे हाती घेतली असून प्रत्येकाने वृक्षाचे जतन करावे, त्यामुळे आपले आरोग्य सदृढ, निरोगी राहण्यास मदत होईल सुशोभीकरण कामामुळे आपल्या परिसराला सौंदर्यकरणाचे रूप प्राप्त होईल असे ते म्हणाले.

मीना चव्हाण म्हणाल्या की, प्रभागामध्ये केलेल्या विकास कामातून नागरिक समाधान व्यक्त करीत असल्यामुळे विश्वास संपादन केला आहे, प्रभागातील प्रश्न सोडवण्यासाठी नागरिकांचीच कमिटी स्थापन केली जाईल त्यातून तातडीने प्रश्न मार्गी लागली जातील असे त्या म्हणाल्या.

# खेळामुळे विद्यार्थ्यांचा शारीरिक व मानसिक विकास होतो

**ज्ञानेश्वर खुरांगे यांचे प्रतिपादन**

नगर – राज्य सरकारने आता खेळाडूंसाठी विविध सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या असून, शासकीय सेवेत खेळाडूंसाठी आरक्षण उपलब्ध करून देण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी खेळाकडे करिअर म्हणून पहावे. खेळामुळे शारीरिक व मानसिक विकास होतो, असे प्रतिपादन राज्य क्रीडा मार्गदर्शक ज्ञानेश्वर खुरांगे यांनी केले.




तारकपूर येथील सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन करताना राज्य क्रीडा मार्गदर्शक ज्ञानेश्वर खुरांगे व संस्थेचे पदाधिकारी.

## सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये वार्षिक क्रीडा महोत्सव

तारकपूर येथील सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन राज्य क्रीडा मार्गदर्शक ज्ञानेश्वर खुरांगे यांच्या हस्ते हवेत फुगे सोडून करण्यात आले. यावेळी सायकलपटू जसमित वधवा, संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी, सचिव गोपाल भागवानी, विश्वस्त हरेश मध्यान, दामोधर माखिजा, रूपचंद मोटवाणी, सुरेश हिरानंदानी, प्राचार्या गीता तांबे, उपप्राचार्या कांचन पापडेजा, मुख्याध्यापिका गोदावरी किर्तानी, क्रीडा शिक्षक अमोल धोपावकर आदींसह शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थी उपस्थित होते. विविध खेळांत नैपुण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना गौरव चिन्ह प्रदान करण्यात आले.

श्री. खुरांगे म्हणाले की, सर्वांगीण विकास व्हावयाचा असेल, तर विद्यार्थीदशेतच खेळाची आवड जोपासली गेली पाहिजे. खेळामुळे मानसिक संतुलन चांगले राहते. यश अपयश पचवण्याची क्षमता वाढते, असे ते म्हणाले.

सायकलपटू जसमित वधवा म्हणाले की, खेळामध्ये करिअरच्या संधी असून, मी त्याचे एक चांगले उदाहरण आहे. खेळामुळेच माझी खऱ्या अर्थाने समाजामध्ये ओळख निर्माण झाली. विद्यार्थ्यांनी नियमित व्यायाम, सायकलिंग व विविध खेळ खेळावेत. कोणत्याही बाबतीत सातत्य गरजेचे असते. सातत्यपूर्ण खेळामुळे भविष्यातील वाटचाल यश व आनंद देणारी ठरते, असे ते म्हणाले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी, सचिव गोपाल भागवानी यांनी भाषण केले. प्राचार्या गीता तांबे यांनी वार्षिक अहवाल सादर केला. विद्यार्थ्यांनी संचलन, कवायती सादर केल्या. पाहुण्यांचा परिचय गोदावरी किर्तानी यांनी करून दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रियंका मंगलारप व गीता दुमाटे यांनी केले, तर आभार भावना डहाळे यांनी केले.



आयर्न मॅन मयुर बोठे यांचा सन्मान करताना प्रशांत गोडसे, भाऊ गोडसे, संपत घोलप, दादासाहेब लवांडे, विलास होळकर, बालूदादा कासार, वैभव गोडसे आदी.

# आयर्न मॅन स्पर्धेत विक्रम करणाऱ्या मयुर बोठे यांचा सन्मान

नगर – पुणे वनविभागात सहाय्यक वनसंरक्षकपदी कार्यरत असलेल्या व नगर तालुक्यातील वाळकी येथील सुपुत्र असलेल्या मयूर बोठे यांनी जिद्दीच्या बळावर ऑस्ट्रेलिया येथे संपन्न झालेल्या आयर्न मॅन स्पर्धेत विक्रम नोंदवत अवघ्या १३ तास २२ मिनिटात स्पर्धा यशस्वीरित्या पूर्ण केली.

यानिमित्त अहिल्यानगर येथे प्रशांत गोडसे आणि मित्र परिवाराच्या त्यांचा नुकताच सत्कार करण्यात आला. याप्रसंगी भाऊ गोडसे, संपत घोलप, दादासाहेब लवांडे, विलास होळकर, बालूदादा कासार, वैभव गोडसे आदी उपस्थित होते.

दरम्यान, या स्पर्धेसाठी पोहणे, धावणे आणि सायकल चालवणे अशा तिन्ही स्पर्धांमध्ये शारीरिक क्षमतेची कसोटी होती. ऑस्ट्रेलियामध्ये झालेले स्पर्धेत ३.८ किलोमीटर पोहणे, १८० किलोमीटर सायकलिंग आणि ४२ किलोमीटर धावणे अशी स्पर्धा १७ तासात पूर्ण करायची असतानाही मयूर बोठे यांनी १३ तास २२ मिनिटात स्पर्धा पूर्ण करून आयर्नमॅन हा किताब पटकावला.

त्यांना दीपक पवार, विजय गायकवाड, राहुल पाटील, सुरेश साळुंखे, तुषार चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले.

# मुलांनी मोबाईलचा मोह टाळून मैदानात उतरावे

### संतोष बारगजे यांचे प्रतिपादन

नगर – क्रीडा सप्ताहा आयोजनाचा मुख्य उद्देशच मुलांनी मोबाईलचा मोह टाळून खेळासाठी मैदानावर उतरावे. त्यासाठी राज्य शासन दरवर्षी या सप्ताहाचे आयोजन करते आहे. विद्यार्थी जीवनात मैदानी खेळ आवश्यक आहेत, असे प्रतिपादन जिल्हा सचिव संतोष बारगजे यांनी व्यक्त केले. यानिमित्ताने आयोजित जिल्हास्तरीय सब –जुनियर तायक्वांदो स्पर्धा उत्साहात पार पडल्या.



जिल्हास्तरीय सब –जुनियर तायक्वांदो स्पर्धेचे फाईट लाऊन उद्घाटन करताना क्रीडा अधिकारी भाऊराव वीर, सचिव संतोष बारगजे, शैलेश गवळी, अविनाश काळे आदी.

## क्रीडा सप्ताहनिमित्त तायक्वांदो स्पर्धा उत्साहात

अहिल्यानगर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, क्रीडा परिषद, अहिल्यानगर ऑलिंपिक असोसिएशन व अहिल्यानगर जिल्हा तायक्वांदो असोसिएशनतर्फे आयोजित जिल्हास्तरीय सब –जुनियर तायक्वांदो स्पर्धेचे उद्घाटन क्रीडा अधिकारी भाऊराव वीर यांच्या हस्ते झाले. या स्पर्धेत जिल्ह्यातील २०० खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. यावेळी क्रीडा मार्गदर्शक विशाल गर्जे, क्रीडा मार्गदर्शक ज्ञानेश्वर खुरांगे, क्रीडा अधिकारी प्रियंका खिंडरे, अहिल्यानगर ऑलिंपिक असोसिएशनचे सचिव शैलेश गवळी, अविनाश काळे, सहसचिव अलताफ कडकाले, संगमनेरचे प्रशिक्षक लक्ष्मण शिंदे, राष्ट्रीय पंच गोरक्ष गालम, अहिल्यानगरचे प्रशिक्षक रवी यादव, विशाल जंजाळ आदी उपस्थित होते. यावेळी क्रीडा अधिकारी भाऊराव वीर, शैलेश गवळी, अविनाश काळे यांनी मार्गदर्शन केले.

स्पर्धेतील मुलांचा निकाल : विराज आरोटे, श्रुतीक काळे, एलेक्स ओसकर, भैरवनाथ जाधव, देवंश सोमवंशी, देव सत्रे, श्रीयश वाघ, शिवराज नागपुरे, अभिमन्यु खताळ, संग्राम सत्रे, यश जाधव, रेहान शेख, ईश्वर चत्तर, अर्थव वाळुंज, नजिम पठाण, मोहमद हुसेन, अर्नेश पांडे, नक्ष अंकम, आरोह मुनोत, समर्थ डेगीया, श्रीकांत गायकवाड, आशुतोष देवडे, नील लखपती, पार्थ घोडके, संघर्ष वाटूरे, आर्यन सैनी, आयुष काळे, सार्थक वाळूंज, आर्यन जाधव, सर्वेश कोकरे, वीर कलापुरे, रोहण चौव्हाण, रोशन चित्ते, रोहित शिंदे, सोमेश्वर कदम, आर्यन खाकाळ, साईश ठाकूर, यश घोडके, समर्थ वाघ, युवराज लाळगे, यश नगरकर व स्वराज वाघ, सक्षम एनोर, प्रसाद गहिले, विराज कोतकर, स्वराज शिंदे, कार्तिक काळे, अविष्कार गुंजाळ, हरिदास धोत्रे, नमन लोखंडे.

मुलींच्या स्पर्धेचा निकाल – अक्षरा शिंदे, श्रद्धा कलगुंडे, अलिया सय्यद, अनुष्का काळे, वेदांती दळवी, मनस्वी देशमुख, आर्या जोशी, स्वरांजली मेहर, कार्तिकी वंजारी, रुचा आहेर, मनस्वी शिंदे, अनिता दळवी, स्वाती भोसले, युगंधरा जाधव, श्रुती कोतवाल, निर्वी कापसे, प्रांजल पोटे, अनुष्का पर्जने, हुरेन सय्यद, माधवी दातार, राजेश्वरी चौधरी, रितु सैनी, श्रीशाली लोखंडे, शरयु शिंदे, स्नेहा गुंजाळ, जिविका वाघमारे, श्रेया ससे, आदिती दळवी, गुंजन घोडके, श्रद्धा कोतवाल, संस्कृती गर्जे, आचल भगत, जयश्री हजारे, श्रावणी गंजाळ, धनश्री कोतकर, पल्लवी पालवे, तेजल पवार.



केडगावच्या चर्चमध्ये ख्रिसमसनिमित्त अवतरलेले चिमुकले सांताक्लॉज छायाचित्रात दिसत आहेत.

## केडगावच्या चर्चमध्ये अवतरले चिमुकले सांताक्लॉज

नगर – शिक्षणासह संस्काराचे धडे देणाऱ्या केडगाव, मोहिनी नगर येथील जैनाचार्य श्री शिवमुनीजी गुरुकुल (जेएसएस) स्कूल पूर्व प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांना ख्रिसमस निमित्त चर्चमध्ये सहल घडविण्यात आली. भूषण नगर येथील चर्च ऑफ द नॅझरीनमध्ये सांताक्लॉजच्या वेशभूषेत चिमुकले दाखल झाले होते. संपूर्ण चर्च चिमुकल्या सांताक्लॉजने बहरले होते.

जेएसएस गुरुकुलच्यावतीने विद्यार्थ्यांमध्ये धार्मिक व सामाजिक ऐक्याची भावना निर्माण होण्यासाठी विविध धर्माच्या सण–उत्सवात मंदिर, मस्जिद, चर्च, गुरुद्वारा आदी विविध धार्मिक स्थळांना भेट देण्याचे उपक्रम सातत्याने सुरु आहे. या पार्श्वभूमीवर स्कूलचे प्राचार्य आनंद कटारिया आणि निकिता कटारिया यांच्या संकल्पनेतून सदरचा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी योगिता पाठक, प्रियांका भोंग, श्रुती पालखे, अर्चना शिरसाठ, आनिशा जाधव, बिना आरवडे, आरती राऊत, अनुपमा तोडमल उपस्थित होते.

आनंद कटारिया म्हणाले की, भविष्यातील पिढी घडविण्यासाठी मुलांमध्ये संस्कार व धार्मिक ऐक्याची रुजवण होणे आवश्यक आहे. शाळेत विद्यार्थ्यांना शिक्षण देत असताना विविध धर्माच्या सण–उत्सव काळात त्याचे धर्माची माहिती व शिकवण देखील सांगितली जात असल्याचे त्यांनी सांगितले. चर्चमध्ये रेव्ह. अद्वैत खेडदुगेकर यांनी विद्यार्थ्यांना ख्रिश्चन धर्म, प्रभू येशूंचा जन्म व सांताक्लॉजची माहिती दिली. मुलांच्या उपस्थितीमध्ये देशाच्या सुख, शांती व धार्मिक ऐक्यासाठी प्रार्थना करण्यात आली.




## ब्ल्यू डायमंड स्कूलमधील शिक्षकांचा फाउंडेशन बिल्डर अ‍ॅवॉर्डने सन्मान

चित्रकुट गुरूकुल यांच्या वतीने नवीन पिढी घडविण्यासाठी योगदान देणाऱ्या शिक्षकांना फाउंडेशन बिल्डर वॉर्डने सन्मानित करण्यात आले. अहिल्यानगरमधील ५० हून अधिक शाळांमधील सुमारे २०० शिक्षकांचा सन्मान सोहळा नुकताच झाला. या सोहळ्यात वडगाव गुप्ता येथील ब्ल्यू डायमंड स्कूलमधील शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. सन्मानप्राप्त शिक्षकांचे ब्ल्यू डायमंड अ‍ॅकॅडमीचे प्राचार्य सुजित डोंगरे व शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.

## 'निधी आपके निकट' कार्यक्रमाचे २७ डिसेंबरला नगरमध्ये आयोजन

नगर – अहमदनगर कर्मचारी भविष्य निधी संघठनमार्फत व्यंकटेश मल्टीस्टेट को–ऑप सोसायटी लिमिटेड, भारत गॅस कॉलनीजवळ, पाईपलाइन रोड अहिल्यानगर येथे २७ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता 'निधी आपके निकट' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

ईपीएफओ सदस्य, निवृत्तीवेतन धारक आणि कंपनी मालकांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन कर्मचारी भविष्य निधी संघटनेच्या सहायक भविष्य निधी आयुक्तांनी केले आहे.

## प्रियदर्शनी पब्लिक स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

नगर – प्रियदर्शनी पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, भिंगार या शाळेचे दोन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलन २०२४–२५ उत्साहात झाले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणुन तालुका पोलिस ठाण्याचे स.पो.नि. प्रल्हाद गिते, प्रोफेसर सुलतान शेख, वाहतुक निरीक्षक अजित थोरात, सुरक्षा निरीक्षक सुनिल अकोलकर उपस्थितीत होते. दिपप्रज्वलन करुन स्नेहसंमेलनाचे उद्घाटन झाले. प्रमुख पाहुण्यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी आपले क्षेत्र आपल्या इच्छेने निवडावे आणि त्यामध्ये उत्तुंग यश संपादन करून आपल्या आई–वडीलांचे आणि शिक्षकांचे नाव उज्वल करावे असे सांगीतले.



प्रियदर्शनी पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, भिंगार या शाळेचे दोन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलनाचे दीपप्रज्वलन करताना स.पो.नि. प्रल्हाद गिते, प्रोफेसर सुलतान शेख, अजित थोरात, सुनिल अकोलकर, प्राचार्या श्रीम. अंजली बोधक आदी.

पहिल्या दिवशी भारतीय संस्कृती आणि दुसऱ्या दिवशी हे जीवन सुंदर आहे या आशयावर हे स्नेहसंमेलन आधारित होते. प्रियदर्शनी शाळेच्या क्रीडांगणावर वार्षिक स्नेहसंमेलन झाले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी आपल्या नृत्याविष्काराने उपस्थितांची मन जिंकली. रंगलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी हे जीवन सुंदर आहे या आशयावर नाटीका व विविध हिंदी, मराठी गाणी सादर केली. विद्यार्थ्यांच्या नृत्याविष्काराने सांस्कृतीक कार्यक्रमात रंग भरला. यावेळी उत्कृष्ट शिक्षिका म्हणून सौ. मनिषा फसले यांना सन्मानित करण्यात आले. विविध कला–गुणांच्या सादरीकरणाने उपस्थित पालक यांनी टाळ्यांच्या गजरात विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब खोमणे, उपाध्यक्षा सौ. शोभा खोमणे, अनिकेत खोमणे, प्राचार्या श्रीम. अंजली बोधक, शुभम साठे, उपप्राचार्य अमोल घोरपडे, पर्यवेक्षक कु. थापा अनिता, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, सर्व क्रीडा प्रशिक्षक आणि विद्यार्थी तसेच पालक उपस्थित होते. सूत्रसंचालन शिक्षिका तब्बसुम शेख, श्रद्धा कांबळे व कु. थापा अनिता यांनी केले आणि आभार प्रदर्शन करुन कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## मर्चंटस बँकेच्या तारकपूर शाखेतील महिला कर्मचाऱ्याचा प्रामाणिकपणा

### नजरचुकीने लॉकरबाहेर राहिलेले डायमंड दागिने महिला ग्राहकाला दिले परत

नगर – नगर मर्चंटस को ऑपरेटिव्ह बँकेच्या तारकपूर शाखेतील महिला कर्मचारी दीपाली हेमंत भंडारी यांच्या प्रामाणिकपणामुळे एका महिला ग्राहकाला त्यांचे डायमंडचे मौल्यवान कानातले परत मिळाले आहेत. समता महेश पाटनी असं या महिला ग्राहकाचे नाव असून त्या बँकेतील लॉकरमध्ये मौल्यवान दागिने ठेवण्यासाठी आल्या होत्या. यावेळी नजरचुकीने त्यांचे डायमंडचे कानातले लॉकरबाहेरच राहिले. दीपाली भंडारी यांच्या ही बाब लक्षात येताच त्यांनी शाखाधिकारी राजश्री अल्लडवार यांच्या निदर्शनास ही बाब आणून देत दागिने त्यांच्याकडे सुपूर्द केले.



नजरचुकीने लॉकरबाहेर राहिलेले डायमंड दागिने महिला ग्राहकाला परत करताना मर्चंटस बँकेच्या महिला कर्मचारी दीपाली भंडारी शाखाधिकारी राजश्री अल्लडवार व इतर.

अल्लडवार यांनी शहानिशा करून पाटनी यांच्याशी संपर्क साधला आणि पूर्ण चौकशी करून दागिने त्यांच्याकडे सुपूर्द केले. मोठी चीजवस्तू व्यवस्थित परत मिळाल्याने पाटनी यांनी दीपाली भंडारी आणि बँकेच्या स्टाफचे कौतुक करून बँकेचे खातेदार असल्याचा नेहमीच आनंद होतो आणि आपली सर्व अनामत याठिकाणी सुरक्षित आहे याची प्रचीती आल्याचे म्हटले. पाटनी यांनी दीपाली भंडारी, राजश्री अल्लडवार व स्टाफप्रती आभार व्यक्त करणारे पत्र दिले. मर्चंटस बँकेच्या तारकपूर शाखेचे संपूर्ण संचालन महिला अधिकारी, कर्मचारी यांच्यामार्फत केले जाते.बँकेचे संस्थापक व विद्यमान चेअरमन हस्तीमल मुनोत यांनी या प्रामाणिकपणाबद्दल दीपाली भंडारी, अल्लडवार व सर्व स्टाफचे कौतुक करून अभिनंदन केले कर्मचारी वर्गाची तत्पर आणि प्रामाणिक सेवा ही बँकेसाठी नेहमीच अभिमानाची गोष्ट असल्याचे त्यांनी म्हटले. बँकेचे व्हाईस चेअरमन अमित मुथा व सर्व संचालक मंडळाने तसेच सीईओ सुनील पुराणिक, जॉइंट सीईओ नितीन भंडारी यांनी तारकपूर शाखेतील स्टाफचे अभिनंदन करून अशीच प्रामाणिक सेवेची परंपरा भविष्यातही कायम राखली जाईल असा विश्वास व्यक्त केला.

## ग्लोबल बुक ऑफ एक्सीलेंस, इंग्लंडकडून अभिनेता दिलीप जोशी यांचा सन्मान

मुंबई – टेलीविज़न क्षेत्रात नवीन विश्व विक्रम प्रस्थापित केलेल्या तारक मेहता का उलटा चष्मा मालिकेने ४२०० एपिसोड पूर्ण केले आहेत व अजूनही ही मालिका लोकप्रियतेच्या शिखरावर आहे



ग्लोबल बुक ऑफ एक्सीलेंस, इंग्लंडकडून अभिनेते दिलीप जोशी सन्मानित करण्यात आले.

या मालिकेत जेठालालचे पात्र साकारणाऱ्या अभिनेता दिलीप जोशी यांना ग्लोबल बुक ऑफ एक्सीलेंस, इंग्लंड कडून अध्यक्ष डॉ. मनीष कुमार व उपाध्यक्ष डॉ. दीपक हरके यांच्या हस्ते आयकॉनिक एक्टर ऑफ २०२४ पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी या मालिकेचे निर्माते असित मोदी उपस्थित होते.

## 'काळी आई ओलावा संवर्धन'चा २८ डिसेंबर रोजी होणार प्रारंभ

### भाऊसाहेब थोरात जन्म शताब्दीचे औचित्य साधून पीपल्स हेल्पलाइनचा पुढाकार



नगर – दंडकारण्य चळवळीचे प्रणेते ग्रीन मार्शल भाऊसाहेब थोरात यांच्या जन्म शताब्दीचे औचित्य साधून पीपल्स हेल्पलाइनच्या पुढाकाराने नान्नज दुमाला (ता. संगमनेर) येथून २८ डिसेंबर पासून काळी आई ओलावा संवर्धन योजना राबविण्यात येणार असल्याची माहिती अ‍ॅड. कारभारी गवळी यांनी दिली.

तळेगाव दिघे ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य हरिभाऊ दिघे यांनी आपल्या ज्युनिअर कॉलेजच्या परिसरात शेकडो झाडे जगवली आणि विद्यार्थ्यांमध्ये ग्लोबल वॉर्मिंगच्या विरोधात जागृती निर्माण केली. प्राचार्य दिघे यांच्या सन्मानार्थ नान्नज दुमाला ग्रामस्थांच्या वतीने व संघटनेच्या पुढाकाराने शनिवारी त्यांना हरित श्रीमंत प्राचार्य असा सन्मान देण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

सन १९७२ साली महाराष्ट्रासह देशात मोठा दुष्काळ पडला. त्यानंतर देखील पाण्याचे योग्य नियोजन झाले नसल्याने गेली ५० वर्षे लाखो शेतकरी दारिद्र्याच्या खाईत जाऊन पडले. पीपल्स हेल्पलाइनच्या पुढाकाराने आणि नान्नज दुमाला ग्रामस्थांच्या माध्यमातून काळी आई ओलावा संधारण योजना राबविण्याचा निर्णय करण्यात आला आहे. त्यासाठी विज्ञानाने स्पष्ट केलेल्या रेनगेन बॅटरीचा वापर केला जाणार आहे.

विनायक गुंजाळ यांच्या ३५ एकर शेतामध्ये रेनगेन बॅटरीचा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या शेतामध्ये अनेक ठिकाणी पावसाचे पाणी उताराच्या बाजूला वाहते. त्याला आडवे वीस फूट लांबीचे, तीन फुट रुंदीचे आणि आठ फुट खोलीचे खड्डे खोदून त्यामध्ये दगड, गोटे भरले जाणार आहे आणि वरच्या बाजूला थोडा मुरूम भरला जाणार आहे. पावसाळ्यात उताराच्या बाजूला वाणारे सर्व पाणी या रेनगेन बॅटरीच्या दगड गोट्यांनी भरलेल्या खड्ड्यामध्ये सोडले जाणार आहे. त्यातून बाष्पीभवन २० टक्के पेक्षा जास्त होणार नाही, कारण ऊन, वारा यातून होणारे बाष्पीभवन पावसाचे पाणी जमिनीच्या खाली गेल्यामुळे थांबले जाणार आहे. त्यामुळे धनराई सारख्या जिरायत फळबागांना वर्षाचे ३६५ दिवस ओलावा मिळणार आहे. उन्हाळ्याच्या दिवसात देखील अशा फळझाडांना वरच्या पाण्याची गरज लागणार नाही. परंतु ठिबक पद्धतीने फळबागांची लागवड यशस्वी होऊ शकणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.महाराष्ट्रात ६५ ते ७० टक्के जमीन ही फक्त जिरायती आहे. रेनगेन बॅटरीमुळे या सर्व जमिनी हंगामी बागायत होवू शकणार आहेत. रेनगेन बॅटरीच्या माध्यमातून नैसर्गिक रित्या भूमिगत जलसाठे निर्माण होतात त्यातून त्या जमिनीतील फलझाड्यांना वर्षभर ओलावा मिळत असल्याचे म्हंटले आहे.

## येशू ख्रिस्ताचा जन्म - शांती, प्रेम आणि आशेचा संदेश

ख्रिसमस हा ख्रिश्चनांसाठी सर्वात महत्वाचा सण आहे जो येशू ख्रिस्ताचा जन्म म्हणून साजरा केला जातो. ख्रिसमस हे नाव जुन्या इंग्रजी वाक्यांश "Chrites Maesse" वरून आले आहे ख्रिस्त हा ग्रीक शब्द 'ख्रिस्टोस' आहे जो हिब्रू शब्द Maaiah चे भाषांतर आहे, ज्याचा अर्थ 'अभिषिक्त' आहे.

Mam¡sse या लॅटिन शब्दातील Missa, जो युकेरिस्टच्या (प्रभुभोजन) उत्सवाचा संदर्भ देतो. हे बेथलेहेममध्ये कुमारी मारियेद्वारे येशू ख्रिस्ताच्या चमत्कारिक जन्माचे चिन्हांकित करते. तथापि, ख्रिसमसमागील मुख्य संदेश हा आहे की देवाने आपला एकुलता एक पुत्र या पृथ्वीवर जगाचा तारणहार म्हणून पाठवला, मानवतेला त्यांच्या पापांपासून वाचवण्यासाठी, त्याच्यावर आणि वधस्तंभावरील त्याच्या बलिदानावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला वचन दिले, अनंतकाळचा वारसा. खरा ख्रिसमस संदेश खूप खोलवर जातो, देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे.

ख्रिसमस जगभरात साजरा केला जातो, त्यात भेटवस्तू आणि मिठाई वाटणे, प्रत्येकाशी प्रेम आणि आनंद वाटणे, गरीब आणि गरजूंना मदत करणे, सजावट करणे इत्यादी विविध परंपरा आणि उत्सव आहेत. ख्रिसमसशी संबंधित काही परंपरांमध्ये जन्म देखावा (नेटिव्हिटी सीन) तयार करणे आणि सजवणे समाविष्ट आहे.

**जन्म दृश्य (नाटिव्हिटी सीन)** हे क्रिब म्हणूनही ओळखले जाते, हे येशू ख्रिस्ताच्या जन्माचे त्रिमितीय प्रतिनिधित्व आहे. ही एक परंपरा आहे जी चर्च, शाळा आणि घरांमध्ये साजरी केली जाते.

जन्माच्या दृश्यात काही घटकांचा समावेश होतो.

**येशू बाळ (क्राइस्ट चाइल्ड)** – दृश्याचा सर्वात आकर्षक आणि प्रकाशमय केलेला भाग, बहुतेक वेळा कपड्यांमध्ये गुंडाळलेले चित्रित केले जाते.

**गोठा–** येशू ख्रिस्ताचा नम्र जन्म एका तबेलीत चित्रित केले जाते.

**बैल आणि गाढवे** – तांबेलीतील पाळीव प्राणी दर्शवत आहेत.

**मरिया आणि योसेफ, देवदूत** – देवदूत गॅब्रिएल जो स्वर्गातून शांतीचा संदेश येशूच्या जन्माचा मॅरियम आणि मेंढपाळांना देण्यास आला होता

**तारा** – येशूच्या जन्माच्या वेळी दिसलेला तारा ज्यानी मेंढपाळांना येशूच्या जन्मस्थानाचा मार्ग दाखवला.

**ज्ञानी पुरुष आणि उंट** – ज्ञानी पुरुषांचे चित्रण (मागी) जे येशूकडे सोने, लोबान आणि गंधरस भेटवस्तू घेऊन आले होते. एपिफनीवर मागींचे स्मरण केले जाते, ज्याला '३ किंग्स डे' असेही म्हणतात. उंटांचा अर्थ असा आहे की त्या वेळी उंटांचा वापर लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी केला जात असे, उंट सामान्यत: पूर्वे कडील तीन ज्ञानी पुरुषांनी (मागी) नवजात येशूला भेट देण्यासाठी केलेल्या प्रवासाचे प्रतिनिधित्व करतात.

**मेंढपाळ** – ते रात्री आपले कळप पाळत होते तेव्हा एक देवदूत त्यांना दिसला आणि त्यांना सांगितले की तारणहार बेथलेहेममध्ये जन्माला आला आहे. देवदूताने त्यांना गोठ्यात कापडात गुंडाळलेले बाळ शोधण्यास सांगितले. बायबल आपल्याला सांगते की येशूच्या जन्मानंतर एका देवदूताने काही मेंढपाळांना दर्शन दिले आणि त्यांना सांगितले की तारणहार आला आहे, देवाने केवळ येशूला पृथ्वीवर आणले नाही, तर त्याने असे अनपेक्षित मार्गाने केले आणि त्याची उपासना करणारे पहिले अभिषिक्त राजे किंवा राणी नव्हते, तर गोठ्यातील मेंढपाळ होते.

मेंढपाळांना ही सुवार्ता कळताच ते येशूला पाहण्यासाठी घाईत निघाले आणि देवदूताने सांगितल्याप्रमाणे ते बाळ येशूला शोधत पोहोचले.

ख्रिसमसशी संबंधित काही परंपरांमध्ये सांताक्लॉजच्या भूमिकेचा समावेश होतो जो ख्रिसमसच्या वेळी सर्वांना भेटवस्तू वितरीत करतो.

**सांताक्लॉज** हे खरंतर सेंट निकोलस होते ज्याचा जन्म इसवी सन २८० च्या सुमारास आधुनिक तुर्कीमधील मायरा जवळ पाटारा येथे झाला होता. ते अनाथ तरुण होते आणि त्यांना वारसाहक्काने मोठी रक्कम मिळाली होती, जी त्याने गरीब आणि आजारी लोकांना मदत करण्यासाठी वापरली होती. त्यांचे सर्वात प्रसिद्ध कृत्य होते कि त्यांनी तीन गरीब बहिणींना, हुंडा देऊन त्यांना त्यांच्या पित्याद्वारे गुलामगिरीत विकणापासून वाचवले.


**ख्रिसमस ट्री सजवण्याची परंपरा** – १६ व्या शतकात जर्मनीपासून सुरू झाली आणि अजूनही चालू आहे. ही परंपरा कारण दरवर्षी ख्रिश्चन ख्रिसमसच्या दिवशी ख्रिसमस ट्री सुंदर रित्या सजवतात.

**घरांवर तारे लटकवण्याची आणि ख्रिसमस ट्री वर ठेवण्याची परंपरा** – ही परंपरा प्रामुख्याने बायबलमधील बेथलेहेमच्या ताऱ्याचे प्रतीक आहे, जो येशू ख्रिस्ताचा जन्म झाला तेव्हा आकाशात दिसला आणि ज्ञानी माणसांना बाळ येशूकडे मार्गदर्शन केले. हे आशा आणि दैवी मार्गदर्शनाचे प्रतिनिधित्व करत आहे

**भेटवस्तूंची परंपरा** – बायबलनुसार या परंपरेत, मागी (ज्ञानी पुरुष) ज्यांनी ६ जानेवारी रोजी येशूला सोने, लोबान आणि गंधरस भेटवस्तू दिल्या, ज्याला आता एपिफनी म्हणून ओळखले जाते. अनेक लोक ख्रिसमसच्या दिवशी भेटवस्तू वितरीत करतात

अशा प्रकारे, येशू ख्रिस्ताच्या जन्माचे स्मरण करून आणि सर्वांसोबत प्रेम आणि आनंद वाटून ख्रिसमस सर्व जगात साजरा केला जातो.

**– रसिका लायल चावला**



## चला करू या बंजी जंपिंग

भटकंती

भारतातही सध्या धाडसी खेळ म्हणजे ॲडव्हेंचर स्पोर्टसची क्रेझ वाढू लागली आहे. रिव्हर राफ्टिंग,गिर्यारोहण, रॉक क्लाईंबिंग असे प्रकार लोकप्रिय होत आहेत. बंजी जंपिंग हा सुद्धा असाच एक धाडसी खेळ. गेल्या काही वर्षांत बंजी जंपिंगचं प्रस्थ चांगलंच वाढलं आहे. आपल्याकडच्या अनेक शहरांमध्ये बंजी जंपिंगही सोय आहे. तुम्हालाही धाडसी खेळांची आवड असेल, जिंदगी ना मिलेगी दोबारा म्हणत जगावेगळं काहीतरी करण्याची हौस असेल तर बंजी जंपिंगची सुविधा असणाऱ्या काही ठिकाणांना नक्की भेट द्या.

* ऋषीकेशला हे धार्मिक स्थान तर आहेच. शिवाय इथे धाडसी खेळांची आवड असणाऱ्यांनाही खूप मजा करता येते. इथल्या मोहन छत्ती येथे बंजी जंपिंगची सोय आहे. इथलं बंजी जंपिंग हा अविस्मरणीय अनुभव ठरू शकतो. निश्चित स्थानाहून बंजी जंपिंग करता येणारं हे भारतातलं एकमेव ठिकाण आहे. जमिनीपासून ८३ मीटर उंचीवर बंजी जंपिंगचं स्थान तयार करण्यात आलं आहे. म्हणूनच हा सर्वात थरारक अनुभव ठरू शकतो.

* लोणावळ्यालाही बंजी जंपिंगची सोय आहे. इथे तुम्ही ४५ मीटरवरून उडी मारता. इथलं बंजी जंपिंग सुरक्षित मानलं जातं. दहा वर्षांच्या पुढील व्यक्ती बंजी जंपिंग करू शकतात. इथे कमी किंमतीत या थरारक क्रीडाप्रकाराचा अनुभव घेता येतो.

* बंगळूरुतल्या बंजी जंपिंगसाठी तुमच्याकडे पुरेसा अनुभव हवा किंवा धोका पत्करायची तयारी हवी. इथे बंजी जंपिंगसाठी निश्चित असं स्थान नाही. तुम्हाला क्रेनमधून उडी घ्यावी लागते. त्यामुळे धोकाही वाढतो. ८० फूट उंचीवरून उडी मारायची असते. त्यामुळे मन घट्ट करूनच बंजी जंपिंग करा.

* गोव्यात अंजुना बीच परिसरात बंजी जंपिंगचा आनंद घेता येतो. इथे फक्त २५ मीटरवरून उंडी मारायची असल्यामुळे छातीत फार धडधडणार नाही.

होम ऑटोमेशन किंवा घराचं यांत्रिकीकरण ही संकल्पना भारतात आत्ता कुठे मूळ धरू लागली आहे. त्याचा वटवृक्ष व्हायला वेळ लागेल. सध्या काही श्रीमंतांच्या घरीच हे तंत्रज्ञान पहायला मिळतं. घरातल्या प्रत्येक उपकरणावर नियंत्रण मिळवून देणारी ही प्रणाली अद्याप सर्वसामान्यांच्या आवाक्यात आलेली नाही. पण राजस्थानच्या प्रांजल कचोलियाने हे शिवधनुष्य पेललं आणि लाखो रुपयांची ही प्रणाली अवघ्या काही हजारांमध्ये उपलब्ध करून दिली.

## स्मार्ट घरांसाठी मस्त पर्याय

अचिव्हर

घरातून बाहेर पडून बरेच दूर गेल्यावर दिवा, पंखा, टीव्ही सुरू राहिल्याचं आपल्या लक्षात येतं. मग स्वत:चाच राग येतो. अशा वेळी शेजाऱ्यांना सांगावं लागतं. पण तोही पर्याय नसेल तर काय करायचं? प्रत्येकानेच ही परिस्थिती कधी ना कधी अनुभवलेली असते. राजस्थानच्या प्रांजल कचोलियाने यावर प्रभावी उपाय शोधला. घराबाहेर असतानाही तुम्ही घरातले सुरू राहिलेले दिवे, पंखे एका ॲपच्या मदतीने बंद करू शकता. 'घरांचं यांत्रिकीकरण' ही संकल्पना परदेशात बरीच लोकप्रिय ठरली असली तरी भारतातला तिचा आवाका मर्यादितच आहे. या तंत्रज्ञानासाठीचा प्रचंड खर्च हे यामागचं मुख्य कारण आहे. घरात ही प्रणाली बसवून घ्यायची तर किमान ८ ते १० लाख रुपये खर्ची पडतात. अर्थातच सर्वसामान्यांना हा खर्च परवडणारा नसतो. म्हणूनच प्रांजलने 'ईडन स्मार्ट होम्स' हे स्टार्टअप सुरू केलं. प्रांजल आयआयटी दिल्लीमधून इंजिनिअरींग केलं असून या स्टार्टअपच्या माध्यमातून त्याने परवडणाऱ्या दरातली स्मार्ट होम प्रणाली विकसित केली आहे.



शिकत असताना सुटीत कोट्याला आपल्या घरी आला असताना प्रांजलने होम ऑटोमेशन विक्रेत्याची भेट घेतली. ही प्रणाली ३ बीएचके घरात बसवण्यासाठीचा खर्च ८ ते १० लाख रुपयांच्या घरात होता. बऱ्याच जणांना भेटल्यानंतर तो खूपच निराश झाला. पण यातूनच त्याला व्यवसायाची उत्तम संधी गवसली. आयआयटीत परतल्यानंतर त्याने संशोधनाला सुरूवात केली. या क्षेत्रात काम केलेल्या इंजिनिअर्सची टीम उभी केली. मग त्याच्या टीमने एक उत्पादन तयार केलं. हे उत्पादन सध्या उपलब्ध असणाऱ्या तंत्रज्ञानाच्या तुलनेत बरंच उजवं तसंच किंमतही खूप कमी असल्याने सर्वसामान्यांना परवडणारं होतं.

ही प्रणाली घरातल्या स्वीचबोर्डसच्या मागे बसवता येते. यामुळे एका स्मार्टफोन ॲपच्या माध्यमातून तुम्ही घरातली सगळी यंत्रं नियंत्रित करू शकता. ही प्रणाली बसवण्यासाठी घरातलं वायरिंग बदलण्याची गरज नसते. सूचनापत्र वाचून कोणताही इलेक्ट्रिशियन ही प्रणाली बसवून देऊ शकतो. प्रणाली बसवण्यासाठी फक्त पंधरा मिनिटं पुरतात. ॲपवर यंत्र बंद झाली किंवा नाही याची सूचना लगेच उपलब्ध होते. त्यामुळे तुम्ही निश्चिंत मनाने बाहेर जाऊ शकता. यासोबतच या प्रणालीची इतरही बरीच वैशिष्ट्यं आहेत. विशेष म्हणजे याचा खर्च अवघा ९० हजार रुपये आहे. ईडन स्मार्ट होम्सला केंद्र सरकारचं पाठबळ लाभलं आहे. सरकारच्या स्टार्टअप इंडिया कार्यक्रमासाठीही ईडन स्मार्ट होमची निवड झाली होती. प्रांजलचं हे तंत्रज्ञान देशातल्या स्मार्ट होम संकल्पनेला बळ देईल, अशी आशा आहे.

# जोश

### फंडू एसएमएस

छुपाने लगा हूं
आजकल कुछ राज
अपने आप से सुना है...
कुछ लोग मुझको
मुझसे ज्यादा जानने
लगे हैं।

ये वादा है हमारा,
ना छोडेंगे साथ
तुम्हारा। जो गए तुम
हमको भूल कर, ले
आऐंगे पकड कर हाथ
तुम्हारा।

उनकी छत पर गये थे
हम कटी हुई पतंग
लूटने,पगली से नजरें
मिल गयी तो कहने
लगी, सुनो, तुम पतंग
लूटने आये हो या दिल...

### बी ॲलर्ट

## कस्टमर केअरला फोन करताय?




गूगलवर कस्टमर केअर नंबरचा शोधत असाल तर थोडं सावध व्हा. कारण सर्चमध्ये बनावट कस्टमर केअर नंबरही असू शकतो. या क्रमांकावर फोन केल्यास तुमची फसवणूक होऊ शकते. बनावट कस्टमर केअरचे प्रतिनिधी रिमोट ॲक्सेस ॲप्स डाउनलोड करायला सांगतात. या माध्यमातून तुमच्या स्क्रीनवर समोरची व्यक्ती नियंत्रण ठेऊ शकते. त्यामुळे कोणत्याही कस्टमर केअरशी संपर्क केल्यानंतर 'टीम व्यूवर क्वीक सपोर्ट', 'मायक्रोसॉफ्ट रिमोट डेस्कटॉप', 'एनी डेस्क रिमोट कंट्रोल', 'एअर ड्रॉइड रिमोट ॲक्सेस ॲंड फाईल',' क्रोम रिमोट डेस्कटॉप', 'स्प्लॅशशॉट पर्सनल रिमोट डेस्कटॉप' अशी ॲप्स डाउनलोड करायला सांगण्यात आली तर ती अजिबात करू नका.

### स्मार्ट टेक

## आता वापरा इलेक्ट्रिक बनी हॅट आणि शॉल

थंडीच्या दिवसात कानटोप्या, मोजे, स्वेटर वापरले जातात. जाड पांघरूण घेऊन गुडूप झोपावंसं वाटतं. आजच्या तंत्रज्ञानाच्या काळात या वस्तूही स्मार्ट झाल्या आहेत. ब्यूटूथ म्युझिक बनी हॅट खूपच आकर्षक आहे. या बिल्ट इन स्पीकर्सही आहेत. ही हॅट मोबाईल, कंप्युटर किंवा लॅपटॉपला कनेक्ट करून गाणी ऐकता येतात. यूएसबी इलेक्ट्रिक हिटिंग शॉलही आहे. ही शॉल धुता येते. याला डिटॅचेबल केबल आहे. ही केबल काढून तुम्ही शॉल धुवू शकता.




यासोबत इलेक्ट्रिक हिटेड सॉक्स, इलेक्ट्रिक लंच बॉक्स, इलेक्ट्रिक फूट वॉर्मर अशा वस्तूही उपलब्ध आहेत. या वस्तूंमुळे थंडी सुसह्य होऊ शकते.

### ॲप वर्ल्ड

## संकटकाळाचा साथी

आज आपण स्मार्टफोनवर अवलंबून आहोत. स्मार्टफोनमधल्या स्मार्ट फीचर्समुळे आपलं आयुष्य सुसह्य झालं आहे. संकटकाळीही स्मार्टफोन आपली मदत करू शकतो. ॲंड्रॉईडमध्ये इमर्जंसी लोकेशनचीही सोय आहे. स्मार्टफोनमध्ये इमर्जंसी सेवा सेट करता येतील. यासाठी स्मार्टफोनचं पॉवर बटण काही काळासाठी दाबून ठेवा. यानंतर स्क्रीनवर इमर्जंसी एसओएस फीचरवर टॅप करा. यानंतर स्मार्टफोन ११२ क्रमांकाला फोन लावेल. फोन लागल्यावर तो कट करा. यानंतर स्क्रीनवर खालच्या बाजूला मेडिकल इन्फॉर्मेशन हा पर्याय दिसेल. त्यावर क्लिक करा. यात तुमची आरोग्यविषयक माहिती नोंदवता येईल. यानंतर डन हे बटण दाबा. यामुळे संकटकाळी तुम्हाला मदत मिळू शकेल.




### स्मार्ट टिप्स

## वाढवा लॅपटॉपचा वेग

मित्रांनो, लॅपटॉप, कॉम्प्युटरशिवाय आपलं पानही हलत नाही. ऑनलाईन क्लास, वर्क फ्रॉम होममुळे तर ही उपकरणं आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनून गेली आहेत. म्हणूनच लॅपटॉप, पीसी स्लो झाला की चांगलीच पंचाईत होते. आता स्लो झालेल्या पीसीची गती वाढवण्यासाठी या टिप्सची मदत घेता येईल. सर्वात आधी नको असणारी, निरूपयोगी सॉफ्टवेअर्स डिलिट करून टाका. यासाठी कंट्रोल पॅनलमध्ये जाऊन अनइन्स्टॉल प्रोग्रामवर क्लिक करा. इथे तुम्हाला सॉफ्टवेअर्सची यादी दिसेल. तुम्ही वापरात नसणारी सॉफ्टवेअर्स डिलिट करू शकता. डिस्क क्लीन अप हा सुद्धा एक चांगला पर्याय आहे. तुमच्या लॅपटॉपमध्ये बराच डाटा सेव्ह करावा लागत असेल तर रॅम वाढवून घेता येईल. रॅम वाढवून घेतल्यानंतर पीसी किंवा कॉम्प्युटरचा वेग वाढू शकेल.




## ग्रुम अप युअरसेल्फ

ग्रुमिंग

अप टू डेट राहणं ही काळाची गरज आहे. कॉलेज असो वा ऑफिस, तुम्ही व्यवस्थित रहायलाच हवं. विस्कटलेले केस, चुरगाळलेले कपडे, वाढलेली दाढी असा लूक कॅरी करण्याचे दिवस कधीच गेले. मेन्स पार्लर्समध्ये ग्रुमिंगसाठी येणाऱ्या युथची संख्या मोठी असते. त्यामुळेच आता टॉल, डार्क आणि हँडसम दिसायचं असेल तर काही टीप्स फॉलो कराव्या लागतील.

* सर्वात महत्वाची असते ती स्वच्छता. सध्या थंडी असली तरी आंघोळ टाळू नका. गरम पाण्याने आंघोळ केल्यानं तुम्ही फ्रेश व्हाल. चांगला माउथवॉश आणि डिओ वापरा.



* थंडीत मुलांची त्वचाही कोरडी होते. बाजारात चांगले मेन्स फेसवॉश मिळतात. चांगल्या फेसवॉशनं चेहरा धुवून मॉश्चराईज करा.

* तुमच्या पर्सनॅलिटीत भर घालतात ते तुमचे केस. त्यामुळे लेटेस्ट ट्रेंड फॉलो करून छानसा हेअर कट करून घ्या. केस वाढवायला आवडत असतील तर ते नीट मेंटेन करा.

* कपाट उचकटून हाताला लागतील ते कपडे परिधान करू नका. ऑफिसला तुम्ही नीट तयार होऊन जाताच पण कॉलेजमध्येही स्मार्ट दिसण्यासाठी कपड्यांकडे लक्ष द्या. पँटला सूट होईल असाच शर्ट निवडा. उगाचच मिस मॅच करू नका.

* फिटनेस हा आजचा मंत्र आहे. त्यामुळे आठवड्यातून तीन दिवस वॉकिंग किंवा जॉगिंगला जा. सायकलिंग हा ही फिटनेससाठी एक छान ऑप्शन आहे. तुम्ही जिमही जॉईन करू शकता.

* जंक फूड, धूम्रपान टाळा. हेल्दी फूड खा. वाईट सवयींमुळे तुमची पर्सनॅलिटी बिघडून जाते. चुकीच्या सवयी वेळीच सोडा.


* दिवसभराच्या दगदगीनंतर झोप सर्वात महत्वाची. कामाचा ताण, प्रोजेक्ट सबमिशन, असाईमेंट्स असल्या तरी रात्री पुरेशी झोप घ्या. यामुळे तुमचा दिवस मस्त जाईल.

## नववर्षाचा जल्लोष

युवामानस

मित्रांनो, तुम्हालाही नव्या वर्षाची चाहूल लागली असेल. जुनं वर्ष सरायला आता काही दिवसच शिल्लक राहिले आहेत. न्यू इयर सेलिब्रेशनच्या हटके कल्पना तुमच्या सुपीक डोक्यातून निघाल्या असतील. कोणाला फिरायला जायचं असेल, कोणाला मित्रमैत्रिणींसोबत धम्माल पार्टी करायची असेल. कोणाला सिनेमा पहायचा असेल. तर कोणाला मस्त गप्पांवर थिरकायचं असेल. पण काही जण डोंगरमाथ्यावर उगवत्या सूर्याच्या साक्षीनं नव्या वर्षाचं स्वागत करतात. रात्री डोंगर चढायचा आणि सकाळी उगवत्या सूर्याला नमस्कार करून नव्या वर्षाची नवी स्वप्नं सजवायची. कशी वाटते कल्पना? नेहमीच्या वहिवाटेवर न चालता वेगळी वाट निवडणाऱ्यांना न्यू इयर ट्रेकिंग करता येईल. हरिश्चंद्र गड, गोरखगड, नाणेघाट, चंद्रगड, राजगड, सागरगड, वन ट्री हिल ही युथची आवडती ट्रेकिंग डेस्टीनेशन्स आहेत. अनेक ट्रेकिंग संस्था आणि क्लब्ज न्यू इयर ट्रेकिंगचं आयोजन करतात. हुडहुडी भरवणाऱ्या थंडीत डोंगरमाथ्यावर मस्तपैकी तंबू ठोकून शेकोटी पेटवून नव्या वर्षाचं स्वागत करायचं. तेही गरमागरम कॉफीचे घुटके घेत, मित्रांसोबत गाणी म्हणत, तारे-तारकांनी भरलेल्या निळ्या आभाळाच्या साक्षीने. ही कल्पनाच लई भारी वाटते. निसर्गाच्या सानिध्यात मित्र-मैत्रिणी किंवा कुटुंबियांसोबत न्यू इयर सेलिब्रेट करा आणि रिफ्रेश होऊ न जा. मग करताय ना तयारी न्यू इयर ट्रेकिंगची...

## फिटनेस असावा बजेटमधला



फिटनेस मंत्रा

दोस्तांनो,तारुण्य म्हणजे धमाल, मजा आणि भरपूर मस्ती. या दिवसांत तुम्ही खूप फिरता, भरपूर हादडता. खांद्यांवर फारशी जबाबदारीही नसते. तारुण्याच्या बहराचा हा काळ करीअरच्या दृष्टीने महत्त्वाचा असतो तसंच फिटनेस आणि वेलनेसचा पायाही याच काळात घालता येतो. तुम्हाला छान दिसायचं असतं. पीळदार शरीरयष्टी हवी असते. मग जीम लावलं जातं. तिथले ट्रेनर्स सूचनांचा भडीमार करतात. पोषक आहार आणि सप्लीमेंट्स सुचवतात. पण या सगळ्यात बजेटची पार वाटत लागते. प्रोटीन पावडर असो की इतर पोषक घटक... त्यासाठी प्रचंड पैसा ओतावा लागतो. पण सगळ्यांनाच हे जमत नाही आणि फिटनेसचं पार वाटोळं होतं. पण बजेटमध्ये राहूनही तुम्ही फिटनेस राखू शकता. कसा ते पाहू या.

* सर्वात आधी कॅलरी काउंट ॲप डाउनलोड करा. महिन्याचं बजेट ठरवा. त्यात बसणारे पदार्थ निवडा. आपल्या सोयीनुसार खाण्याचं विभाजन करा. आहाराच्या वेळा ठरवा. स्नायू बळकट करायचे असतील तर दिवसातून तीन ते पाच वेळा खायला हवं.

* न्याहारीला चार ब्रेड स्लाईस, एक अंड, दोन अंड्यांचा पांढरा भाग आणि एक चमचा बटर किंवा लोणी खा.

* मधल्या वेळेत दोन मध्यम केळी आणि मूठभर शेंगदाणे खा.

* मांसाहारी लोक दुपारच्या जेवणात दोन पोळ्या, एक मुद भात, वाटीभर चिकन, एक वाटी दही आणि सॅलाड घेऊ शकतात. शाकाहारी चिकनऐवजी वाटीभर डाळ आणि भाजी खाऊ शकतात. चिकनऐवजी फिशचा पर्यायही आहे.

* व्यायामाआधी एक मध्यम आकाराचं केळं, दोन ब्रेड स्लाईस आणि एक चमचा पीनट बटर तर व्यायामानंतर सहा अंड्यांचा पांढरा भाग खा.

* रात्रीच्या जेवणात वाटीभर चिकन किंवा भाजी, भात आणि डाळ व चमचाभर तूप घ्या.

हा सर्वसाधारण आहार आहे. तुम्ही आवडीनुसार आणि गरजेनुसार विविध पोषक पदार्थ खाऊ शकता. आहारात फळं, सुका मेवा यांचा समावेश करू शकता.

वेट लिफ्टिंग करा. यामुळे स्नायू बळकट होतात. पोषक आहारामुळे ही प्रक्रिया सुलभ होते. अर्थात स्नायूंची ताकद वाढवण्यासाठी पुरेसा वेळ द्यायला हवा. त्यासाठी नियमित व्यायाम करा. एका सांध्याऐवजी विविध सांध्यांवर लक्ष केंद्रित करा. दररोज सहा ते आठ तास झोप घ्या. मनासारख्या गोष्टी घडल्या नाहीत तर ताण घेऊ नका.

## चमचमीत गार्लिक पोटॅटो चाट

झटपट रेसिपी

दोस्तांनो, हॉस्टेलमध्ये काही चटपटीत आणि वेगळं खावंसं वाटतं. खोलीत बटाटे असतातच मग गार्लिक पोटॅटो चाट बनवून बघा. हा कुरकुरीत पोटॅटो चाट मित्रमंडळींनाही आवडेल.



**साहित्य :** दोन ते तीन मध्यम आकाराचे बटाटे, दोन चिरलेल्या हिरव्या मिरच्या, अर्धा चमचा लसूण पेस्ट, (लसूण पाकळ्या सोलून वाटून घ्या.), एक कप दही, तेल, चमचाभर मसाला दाणे, दोन चमचे तिखट, चवीनुसार मीठ, चाट मसाला आणि जिरे पूड.

**कृती :** बटाटे अर्धवट उकडून लांबट तुकडे करून तळून घ्या. आता कढईत थोडं तेल तापायल ठेवा. तेल गरम झाल्यानंतर त्यात हिरव्या मिरच्या आणि लसूण पेस्ट घालून परतून घ्या. पाच मिनिटं मंद आचेवर शिजवा. आता त्यात तळलेले बटाटे घाला. मग दह्यामध्ये तिखट, मीठ, जिरेपूड घाला. चांगलं मिसळून घ्या. तळलेले बटाटे या दह्यात घाला. नीट हलवून घ्या. चाट मसाला आणि मसाला दाणे घालून सजवा. दही नसेल किंवा नको असेल तर टॉमेटो सॉसही घालू शकता.

## रुबाबदार दिसायचं तर...



फॅशन पॅशन

ऑफिसमध्ये तुम्ही नीटनेटकं आणि टापटिपच असायला हवं. अशा ठिकाणी कॅज्युअल कपडे घालता येत नाहीत. कडक इस्त्रीचा शर्ट, ट्राउझर अशा पेहरावात ऑफिसला जाणाऱ्यांचा रुबाब काही वेगळाच असतो. अशा कर्मचाऱ्यांना मानही मिळतो. गबाळं राहून काहीच फायदा नसतो. तुम्हालाही तुमच्या व्यक्तिमत्त्वाची छाप पाडायची असेल तर ऑफिसच्या कपडे खरेदी करताना विशिष्ट रंगांना प्राधान्य द्या. ठराविक रंगांचे शर्ट तुमच्याकडे असायलाच हवेत. कोणते आहेत हे रंग? पाहू या.

* पांढऱ्या रंगाची जागा कोणीही घेऊ शकत नाही. इस्त्री केलेला छानशा पांढरा शुभ्र शर्ट तुमचा रुबाब नक्कीच वाढवेल. पांढऱ्या रंगाचे काही गुण आहेत. शांत, मनमिळावू, एकाग्र आणि समर्पित वृत्ती पांढऱ्या रंगातून झळकत असते. असे गुण कार्यस्थळी खूप उपयुक्त ठरतात. पांढरा शर्ट घालून तुम्ही समोरच्यावर प्रभाव टाकू शकता.

* ग्रे शर्टही छान दिसतो. अनेकांना ग्रे कंटाळवाणा आणि एकसुरी रंग वाटतो. पण प्रत्यक्षात तसं नाही. या रंगामुळे तुम्ही उठून दिसाल. ग्रे रंगाचे शर्ट फारसे घातले जात नाहीत. त्यामुळे तुमच्या या निवडीचं कौतुक होईल.


* निळा रंगही आकर्षक आहे. निळ्या रंगातले शेड्स तुम्ही घालू शकता. निळ्या रंगाचे कपडे घालणारे कामाच्या ठिकाणी यशस्वी होतात,, असं एका अभ्यासातून समोर आलं आहे. त्यामुळे तुमच्याकडेही निळा शर्ट असायला हवा.

* हिरवा हा सुद्धा हटके रंग आहे. मात्र तो तुम्हाला नीट कॅरी करता आला पाहिजे. हिरवा रंग समृद्धी, प्रगतीचं प्रतीक असतो. हा रंग ताजेपणाचा अनुभव देतो. त्यामुळे या रंगाचा शर्टही मस्त हॅव आहे. हिरव्या रंगातल्या विविध छटा खूप सुंदर दिसतात.

## धडधड वाढते आहे

मॅच मेकिंग

मी २७ वर्षांची युवती असून माझं लग्न ठरलं आहे. हे माझं लव्ह कम अरेंज मॅरेज असलं तरी आता धाकधूक वाटू लागली आहे. त्याच्याशी लग्न करण्याची माझी इच्छा होती. मधल्या काळात आमचे आई-बाबा एकमेकांना भेटले. आमचं लग्नही ठरलं. पण का कोण जाणे, निर्णय घ्यायला काही वेळ घ्यावा असं मला वाटतंय. हे लग्न वर्षभर पुढे ढकलावं असा माझा विचार आहे. मला त्याच्याशी लग्न करायचं होतं. पण आता सगळं जमून आलेलं असताना मनात धाकधूक आहे. मी काय करू?



**उत्तर :** लग्नाच्या आधीची अस्वस्थता ही अगदी सामान्य बाब आहे. लग्नानंतर आयुष्य आमूलाग्र बदलतं. प्राधान्यक्रम ठरवावे लागतात. त्यातही मुलींना आपलं घर सोडून नव्या घरी जावं लागतं. नवी नाती स्वीकारावी लागतात. प्रेमविवाह असो किंवा ठरवून केलेलं लग्न, मुलांपेक्षा मुलींवर जास्त ताण येतो. आता आवडत्या मुलासोबत तुझं लग्न होत आहे. त्यामुळे त्याच्याशी मनातील या सर्व भावनांबद्दल मोकळेपणाने बोल. तुझ्या अपेक्षा सांग. मनातली भीती, अस्वस्थता नेमकी कशासाठी आहे हे जाणून घे. कारण यामागेही अनेक कारणं असतात. तुला विवाह समुपदेशकांची मदतही घेता येईल. मनात नकारात्मक विचार येऊ देऊ नको. प्रत्येक बदलाकडे सकारात्मकतेने बघ. तुझं नातं नक्कीच फुलेल. दुसरं म्हणजे तो मुलगा तुला का आवडतो आणि अगदी ऐनवेळी तुला कशासाठी वेळ हवा आहे याचं विश्लेषण कर. यामुळे ताणाचं नेमकं कारण कळेल. कुढत राहून प्रश्न सुटणार नाहीत.

# इंजिनिअर्सने स्वास्थ्य उत्तम ठेवल्यास चांगल्या शहराची निर्मिती होऊ शकेल

## इंजि. राजयोगी दशरथजी यांचे प्रतिपादन; एसा सभासदांसाठी पार पडली मेडीटेशन' कार्यशाळा

नगर – संपत्तीपेक्षा मनः शांती जास्त आवश्यक असून चांगले विचार आणि आचरणाच्या माध्यमातून आपण हे साध्य करू शकतो. इंजिनिअर हा समाजात एक चांगला आणि महत्वाचा घटक असून मेडीटेशनच्या माध्यमातून त्यांनी आपले स्वास्थ्य उत्तम ठेवल्यास चांगल्या शहराची निर्मिती करतील व त्याद्वारे एक सदृढ समाजाची निर्मिती होण्यास मदत होते. मेडीटेशन ही भारत देशाने जगाला दिलेली देणगी आहे त्यातून मन शांत होते, वाद कमी होतात, सामाजिक स्तरावर एकता निर्माण होण्यास मदत होत असून त्याचीच आज गरज आहे, असे प्रतिपादन इंजि. राजयोगी दशरथजी यांनी केले



एसा सभासदांसाठी 'एम्पॉवरमेंट ऑफ इंजिनिअर्स फॉर बेटर सोसायटी थ्रू मेडीटेशन' यावर आयोजित कार्यशाळेचे उद्घाटन करताना इंजि. राजयोगी दशरथजी. समवेत राजयोगिनी राजेश्वरी दीदी, सुनंदा दीदी, एसाचे अध्यक्ष आदिनाथ दहिफळे यांच्यासह पदाधिकारी.

आर्किटेक्ट इंजिनिअर्स अँड सर्व्हेअर्स असो. अहील्यानगर, पोलाद स्टील जालना आणि ब्रह्मकुमारीज अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने एम्पॉवरमेंट ऑफ इंजिनिअर्स फॉर बेटर सोसायटी थ्रू मेडीटेशन या मार्गदर्शनपर सेशनचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पुणे ब्रह्मकुमारी सेंटरचे इंजि. राजयोगी दशरथजी बोलत होते. यावेळी एसाचे अध्यक्ष आदिनाथ दहिफळे, पोलाद स्टीलचे सुशांत गव्हाणे, आदेश गुंगे तसेच एसा संस्था सचिव अभिजित देवी, सुनिल औटी, रत्नाकर कुलकर्णी, आदिनाथ घुले, राजेंद्र गवळी, प्रदिप तांदळे, अन्वर शेख, संतोष खांडेकर, विजय पादिर, सतीश कांबळे, एस यू खान, विनायक मैड, अजिंक्य बालटे, भगवान गायकवाड, दिनेश येवले आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अहिल्या नगर सेंटरच्या मुख्य राजेश्वरी दीदी यांनी उपस्थितांचे स्वागत करून नगर मधील सेंटर आणि त्या अंतर्गत घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची आणि सामाजिक कामांची माहिती सर्वांना दिली. पोलाद स्टील प्रायोजित नॉलेज सिरीज अंतर्गत या उपक्रमात राजयोगी दशरथ यांनी इंजिनीअर्स, आर्किटेक्ट तसेच सर्व्हेअर्स यांनी रोजच्या कामाच्या तणावातून मनःशांती करीता दिवसातून आपल्या स्वतः साठी एक तास वेळ ध्यान आणि मेडीटेशन साठी देण्याची गरज असल्याचे नमूद केले.

यावेळी बोलताना राजयोगिनी सुनंदा दीदी यांनी अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजा पैकी निवारा देण्याचे बनवण्याचे महत्त्वाचे काम आर्किटेक्ट इंजिनीअर्स करत असून त्यांचे मानसिक आरोग्य चांगले असेल तर चांगल्या वास्तूची निर्मिती होऊ शकेल त्यासाठी आपल्यासाठी रोज वेळ देऊन मेडीटेशन करण्याचे आवाहन केले. तसेच उपस्थितांकडून गायडेड मेडीटेशन करून घेतले.

संस्था अध्यक्ष आदिनाथ दहिफळे यांनी ब्रह्मकुमारी परिवाराच्या अनेक तालुके आणि जिल्ह्यात शाखा असून अनेक नागरिक या अंतर्गत होणाऱ्या उपक्रमाच्या माध्यमातून जोडले जात असल्याचे नमूद करून संस्था सभासदांनी मेडीटेशन कार्यशाळेमध्ये सहभाग घेऊन मनःशांती साठी हा सोपा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन केले. सूत्रसंचालन ब्रह्मकुमारीज अहील्यानगर सेंटरच्या सुवर्णा दीदी यांनी केले तर एसा सचिव अभिजित देवी यांनी उपस्थित संस्था सभासद आणि नगरकरांचे आभार मानले.



श्री आयप्पा मंदिरात चालू असलेल्या ६० दिवसांच्या महोत्सवात मंडल पूजा व शोभायात्रा काढण्यात येणार आहे.

# अय्यप्पा मंदिरात २६ डिसेंबर रोजी मंडला महापूजा, सावेडीतून शोभायात्रा (तालापोल्ली)

नगर – सावेडीतील श्रीअय्यप्पा मंदिरात चालू असेलेल्या ६० दिवसांच्या मंडल, मकर पूजा उत्सवात २६ डिसेंबरला मंडल पूजा होणार असून यादिवशी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती अध्यक्ष के के शेट्टी यांनी दिली आहे.

श्री अय्यप्पा स्वामीना मानणारा मोठा वर्ग नगरमध्ये आहे. उद्योजक के के शेट्टी व विनया शेट्टी हे दांपत्य नगर मध्ये गेली ४० वर्षापासून मंडला महापूजा उत्सव करतात. शेट्टी हे नगरमध्ये राहण्यास आल्यावर पहिले १० वर्ष त्यांनी घरी हा उत्सव साजरा केला नंतर सावेडी येथे अय्यप्पा मंदिरासाठी जागा घेवून भाविकांनी मंदिराची उभारणी केली तेव्हापासून येथे हा ४१ वा दिवसाचा मंडल महापूजा उत्सव शेट्टी कुटूंबीय व अय्यप्पा सेवा समितीच्यावतीने साजरा करण्यात येतो.

दक्षिण भारतीयांसह महाराष्ट्रातील भाविकांची श्रद्धा असलेले अय्यप्पाचे मंदिर केरळ मधील शबरीमळा येथे असून त्या मुख्य उत्सवाच्या धर्तीवर ६० दिवसांचा उत्सव नगरमध्ये केला जातो. उत्सावा निमित्त पहाटे महागणपती हवन, पूजा संध्या ५ वा प्रोफेसर कॉलनी जवळील महालक्ष्मी मंदिर ते अय्यप्पा मंदिर अशी सावेडीतून शोभायात्रा (तालापोल्ली) काढण्यात येणार आहे. महिला मोती कलरच्या साड्या परिधान करून हातात फुलांनी सजवलेली ताट व त्यामध्ये अर्धा नारळ दिवा प्रज्वलित करतात ही तालापोल्ली पाहण्यासाठी नागरिक गर्दी करतात तर मंदीर परिसर फुलांनी व दिव्यांनी सजविण्यात येतो संध्या ७ वा दीपआराधना करण्यात येते. नंतर देवाची आरती नंतर पुष्पभिषेक करण्यात येणार असून नंतर भाविकांना महाप्रसाद (गोड जेवण) देण्यात आहे. यावेळी हजारो भाविक उपस्थित राहणार आहे. शेवटी हरी वरासम होऊन मंडल पूजा उत्सवाची सांगता होणार आहे. अय्यप्पा सेवा समितीने आयोजित केलेल्या या दोन महिन्याचा उत्सवाची सांगता १४ जानेवारीस मकर पूजा उत्सवाने होणार आहे, तत्पूर्वी हा मंडल महापूजा हा मोठा उत्सव असतो. भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अय्यप्पा सेवा समितीने केले आहे.



सावेडीतील श्री अय्यप्पा मंदिरामध्ये महिला भाविकांच्या वतीने सुख समृद्धी साठी मकर विल्लकु महोत्सवात सर्व ऐश्वर्य पूजा करण्यात आली तसेच त्यांच्या वतीने महाप्रसाद झाला. यावेळी महिला भाविकांचा सन्मान विनया शेट्टी यांच्या हस्ते करण्यात आला.

## राष्ट्रीय ग्राहक दिन कार्यक्रमाचे २७ डिसेंबर रोजी आयोजन

नगर – राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त २७ डिसेंबर रोजी अहिल्यानगर तहसील कार्यालयात सकाळी ११ वाजता जिल्हास्तरीय राष्ट्रीय ग्राहक दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षी राष्ट्रीय ग्राहक दिन २४ डिसेंबर रोजी साजरा केला जातो. यानिमित्ताने आयोजीत या कार्यक्रमास ग्राहक चळवळीशी संबंधित कार्यकर्ते, नागरिकांनी उपस्थित राहून ग्राहक चळवळीशीसंदर्भात शासन स्तरावर राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती जाणून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले आहे.

# मधुमक्षिका पालकांना मधुक्रांती पोर्टलवर नोंदणी करावी

नगर – कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाद्वारे राष्ट्रीय मधुमक्षिका मंडळ, नवी दिल्ली अंतर्गत विकसित केलेल्या Madhukranti.In/nbb या मधुक्रांती पोर्टलवर मधुमक्षिका पालकांनी नोंदणी करण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळाचे संचालक किसन मुळे यांनी केले आहे.

मध आणि मधमाशी संबंधित अन्य उत्पादनांच्या योग्य स्त्रोताचा शोध घेण्याच्यादृष्टीने व अद्यायावत नोंदी ठेवण्यासाठी मधुक्रांती पोर्टल विकसित करण्यात आले आहे. राज्यात 'राष्ट्रीय मधुमक्षिकापालन व मध अभियान' ही केंद्र पुरस्कृत योजना राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने पुणे येथील महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळास यांना राष्ट्रीय मधुमक्षिका पालन व मध अभियान राबविणारी राज्यस्तरीय अंमलबजावणी यंत्रणा म्हणून केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. हे अभियानांतर्गत लघु अभियान १, २ आणि ३ समाविष्ट असून यामध्ये विविध उपक्रम राबविले जाणार आहेत.

### मधुक्रांती पोर्टलमुळे मधुमक्षिका पालकांना मिळणार लाभ

मधुक्रांती पोर्टलवर नोंदणी केल्यास विविध लाभ मिळणार आहेत. यात मधुमक्षिकापालकाला नोंदणीकृत किंवा मान्यताप्राप्त मधुमक्षिकापालक म्हणून ओळख मिळणार आहे. नोंदणी धारकांना १ लाखापर्यंत मोफत विमा उपलब्ध होणार आहे. तसेच विना अडथळा मधुमक्षिका पेट्यांचे स्थलांतर करता येणार आहे.

मधुक्रांती पोर्टलवर नोंदणीसाठी आधार कार्ड, अद्ययावत भ्रमणध्वनी क्रमांक (आधार क्रमांकाशी जोडलेला), मधुमक्षिका पालनासंबंधित तपशील, मधुमक्षिकापालन प्रशिक्षण प्रमाणपत्राची सॉफ्ट प्रत (आकार–२०० केबीपर्यंत), मधुमक्षिकापालकाचा मधुमक्षिका पेट्यांसमवेत फोटो (आकार–१०० केबीपर्यंत) ही कागदपत्रे आवश्यक असणार आहेत.

या नोंदणीसाठी फक्त ऑनलाईन पद्धतीने भरता येणार आहे. स्वमालकीच्या मधुमक्षिका पेट्यांमधील मधुमक्षिका वसाहतींची संख्या १० ते १०० फ्रेमसाठी २५० नोंदणी शुल्क, १०१ ते २५० फ्रेमसाठी ५०० रुपये, २५१ ते ५०० फ्रेमसाठी एक हजार, ५०१ ते १ हजार फ्रेमसाठी दोन हजार, १००१ ते दोन हजार फ्रेमसाठी दहा हजार, २००१ ते ५ हजार फ्रेम साठी २५ हजार, ५००१ ते दहा हजार फ्रेमसाठी एक लाख तर दहा हजारापेक्षा अधिक फ्रेमसाठी दोन लाख नोंदणी शुल्क भरणे आवश्यक आहे.

नोंदणीबाबत अधिक माहितीसाठी राष्ट्रीय मधमाशी मंडळ, नवी दिल्ली ०११–२३३२५२६५, २३७१९०२५ किंवा मधुक्रांती पोर्टल टेक्निकल सपोर्ट– १८००१०२५०२६, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळ, पुणे– ०२०–२९७०३२२८ या क्रमांकावर संपर्क करावा. जास्तीत जास्त मधुमक्षिका पालकांनी मधुक्रांती पोर्टलवर नोंदणी करावी, असे आवाहन या पत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

# चांगल्या आरोग्यासाठी शुध्द पिण्याचे पाणी गरजेचे

### जयेश पटेल यांचे प्रतिपादन

नगर – सध्याच्या युगात मानवी आरोग्यासाठी शुद्ध पाणी हे महत्त्वाचे असून विद्यार्थ्यांनी त्याचा वापर जपून करावा, असे आवाहन रोटरी डिस्ट्रिक्टचे जयेश पटेल यांनी केले. मांडवे (ता. नगर) येथील काकासाहेब म्हस्के माध्यमिक विद्यालयात शुद्ध पेयजल यंत्राचे उदघाटन करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. यावेळी रोटरीच्या अध्यक्षा स्विटी पंजाबी, प्रसन्न खाजगीवाले, सचिव डॉ.बिंदू शिरसाठ, नंदिनी जग्गी, सरपंच सुभाष निमसे, अतुल गांधी उपस्थित होते.



मांडवे (ता. नगर) येथील काकासाहेब म्हस्के माध्यमिक विद्यालयात शुद्ध पेयजल यंत्राचे उदघाटन करताना रोटरी डिस्ट्रिक्टचे जयेश पटेल, अध्यक्षा स्विटी पंजाबी, प्रसन्न खाजगीवाले, सचिव डॉ.बिंदू शिरसाठ, नंदिनी जग्गी, सरपंच सुभाष निमसे, अतुल गांधी आदी.

## काकासाहेब म्हस्के विद्यालयात शुध्द पेयजलचे उदघाटन

पटेल म्हणाले की,रोटरी ही देशातच नव्हे तर परदेशात काम करणारी संस्था आहे.रोटरी ही शैक्षणिक, सामाजिक व आरोग्यासाठी काम करते. काकासाहेब म्हस्के माध्यमिक विद्यालयात वॉटर प्युरिफायर यंत्रणा बसवली आहे. शाळेतील विद्यार्थी आणि कर्मचार्योंना सुरक्षित आणि स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे हा उद्देश आहे. प्युरिफायर देण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते ईश्चचर निमसे यांनी मदत केली. स्वागत गीत,पाणी वाचविणारे जलगीत आणि आरोग्याच्या फायद्यासाठी सुरक्षित पिण्याच्या पाण्याचे महत्त्व या विषयावर स्नेहल खांदवे व क्रांती बोरूडे या विद्यार्थ्यांनी भाषणाद्वारे रोटरी ई–क्लबचे आभार व्यक्त केले. या कार्यक्रमात राष्ट्रीय गणित दिवस साजरा करण्यात आला. गणित दिवसाबद्दल प्रतिक डहाळे व गणित शिक्षक कल्याण ठोंबरे यांनी माहिती दिली. यावेळी संस्थेचे संचालक डॉ.प्रशांत निक्रड, गणेश शेकडे, अल्पना गांधी, शीलू मकर, बापू भुजबळ, मुख्याध्यापक दत्तात्रय गुंड, कल्याण ठोंबरे, अमोल शिलवंत, कुणाल उमाप, तुकाराम बोरुडे, अनर्थ गोवर्धन उपस्थित होते. सूत्रसंचालन श्रद्धा खांदवे व आभार संस्थेचे सचिव सुभाष निमसे यांनी मानले.

# एचडीएफसी लाईफचे देशातील सर्वात तरुण एमडीआरटी हर्ष बोरा यांचा सन्मान

नगर – शहरातील एचडीएफसी लाइफ इन्शुरन्स कंपनीचे विमा प्रतिनिधी हर्ष बोरा यांनी विमा क्षेत्रात उल्लेखनीय काम करत नुकतीच एमडीआरटी (मिलियन डॉलर राउंड टेबल) ही विमा क्षेत्रातिल मानाची पदवी प्राप्त केली आहे. ते एचडीएफसी लाईफ कंपनीचे एमडीआरटी ठरले देशातील सर्वात तरुण प्रतिनिधी ठरले आहेत. याबद्दल नुकताच हर्ष बोरा यांचा उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी एचडीएफसी लाईफचे ब्रँच हेड ओंकार कोकाटे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सचिन जगताप, राजेंद्र चोपडा व सागर बोरा आदी उपस्थित होते.



एचडीएफसी लाइफ इन्शुरन्स कंपनीचे विमा प्रतिनिधी हर्ष बोरा यांनी नुकतीच एमडीआरटी ही विमा क्षेत्रातिल मानाची पदवी प्राप्त केल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना उद्योजक नरेंद्र फिरोदिया आदी.

एचडीएफसी लाईफचे ब्रँच हेड ओंकार कोकाटे म्हणाले, हर्ष बोरा यांनी कमी वयात उत्कृष्ट काम करत एमडीआरटी ही विमा क्षेत्रातिल मानाची पदवी प्राप्त केली आहे, ते एचडीएफसी लाईफ कंपनीचे नगरचे पहिले व देशातील सर्वात तरुण एमडीआरटी ठरल्याने त्यांनी नगरचे नाव पूर्ण देशात उंचावले आहे. याचा अभिमान वाटतो.

नरेंद्र फिरोदिया व एचडीएफसी लाईफचे मॅनेजर प्रशांत भोर यांनीही हर्ष बोरा यांचे कौतुक करत अभिनंदन केले. हर्ष बोरा यांनी सर्वांचे आभार मानून एमडीआरटी होण्यासाठी मी अनेक वर्षांपासून कठोर परिश्रम केले आहेत. माझे गुरूतुल्य सहकारी सागर बोरा यांनी यासाठी केलल्या मार्गदर्शनामुळे मी ही उपलब्धी साध्य करू शकलो, असे सांगितले.



अहिल्यानगर येथे अग्नीवर भरती शिबिरास आलेल्या विद्यार्थ्यासाठी मोफत भोजन व्यवस्था करताना हेल्पिंग हँड फॉर हंगर्स ग्रुपचे सदस्य.

# हेल्पिंग हँड फॉर हंगर्स ग्रुपतर्फे अग्नीवर भरतीसाठी आलेल्या विद्यार्थ्यांसाठी मोफत भोजन व्यवस्था

नगर – अहिल्यानगर येथे अग्नीवर भरती शिबिरास येणारे विद्यार्थ्यांसाठी प्रेमदान चौक येथे हेल्पिंग हँड फॉर हंगर्स ग्रुपच्या वतीने १४ ते २४ डिसेंबर २०२४ या कालावधीत भरतीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी असंख्य तरुण –तरुणी सहभागी झाले होते. या सर्वांची भोजनाची, नाष्टाची व्यवस्था हेल्पिंग हँड फॉर हंगर्स ग्रुप, रोटरी क्लब, इंडियन एक्स सर्व्हिसेस यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत भोजन दिले जात होते .

या उपक्रमाची माहिती देताना संजय खोंडे म्हणाले कि देशसेवेसाठी तरुण–तरणी घरदार सर्वस्व सोडून सीमेवर जात असतात. येथील एम आय आर सी च्या मैदानावर अग्निविर जवानांची भरती झाली. यावेळी हे सर्वजण देशसेवेसाठी सर्वस्व सोडून येत आहे तर त्यांच्यासाठी आपणही काहीतरी योगदान दिले पाहिजे, या विचारातून हेल्पिंग हँड फॉर हंगर्स ग्रुपच्या वतीने आलेले सर्वांसाठी मोफत भोजन व्यवस्था करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले तसेच भविष्यात अजूनही समाजपयोगी उपक्रम राबवणार असल्याचे ते म्हणाले.

या उपक्रमासाठी माजी सेनिक नाना भोरे, कॅप्टन पठारे, मनोज गुजराथी, नवीन बजाज, नंदेश शिंदे, माजी सेनिक कल्याण अधिकारी कोरडे, आदींसह रोटरी क्लबचे विशेष सहकार्य मिळाले. या संस्थेने जो उपक्रम राबवला त्याबाद्दल त्यांचे विशेष आभार अधिकारी यांचे वतीने मानण्यात आले.

# योग्य नियोजन, सातत्य व परिश्रम ही त्रिसूत्री म्हणजे स्पर्धा परीक्षेतील यश

### सिद्धाराम सालीमठ यांचे प्रतिपादन

नगर – केंद्रीय लोकसेवा आयोग, राज्य लोकसेवा आयोग व अन्य स्पर्धा परीक्षमध्ये यश मिळवायचे असल्यास मेहनत, योग्य नियोजन, सातत्य व चिकाटीशिवाय पर्याय नाही. गरिब, श्रीमंत या मानसिकतेत नअडकता विद्याथ्यांनी निश्चयाने स्वतःला सिद्ध करणे म्हणजे स्पर्धा परीक्षेतील यश होय, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले.

रेसिडेन्शिअल कनिष्ठ महाविद्यालयामध्ये सुरु करण्यात आलेल्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या उदघाटन कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. या उपक्रमाचे त्यांनी पुढे आपल्या मनोगतात कौतूक केले. त्याचबरोबर त्यांनी आपल्या महाविद्यालयीन जीवनातील आठवणींना उजाळा देत, विद्यार्थ्यांनी स्वतः नोटस काढाव्यात व मोबाईलचा योग्य वापर करावा असा मौलिक सल्ला देखील दिला.



रेसिडेन्शिअल कनिष्ठ महाविद्यालयामध्ये सुरु करण्यात आलेल्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या उद्घाटन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी शहर पोलिस उपअधिक्षक अमोल भारती, सचिव अॅड. विश्वासराव आठरे पाटील, अध्यक्ष रा. ह. दरे आदी. (छाया : सागर इंगळे)

## रेसिडेन्शिअल कनिष्ठ महाविद्यालयामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करत असातांना उपप्राचार्य दादासाहेब वांदेकर यांनी हे केंद्र सुरु करण्यामागील संस्थेची व विद्यालयाची भूमिका विशद केली. तसेच या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांची मैदानी चाचणी व लेखी परीक्षेसाठी कशाप्रकारे तयारी करून घेतली जात आहे याची माहिती दिली.

याप्रसंगी उपस्थित असणारे शहर पोलिस उपअधिक्षक अमोल भारती यांनी विद्यार्थ्यांना मोबाईलपासून व व्यसनाधिनतेपासून दूर रहाण्याचा सल्ला दिला. वेळेचे योग्य नियोजन व अभ्यासावर लक्ष केंद्रित केल्यास यश हमखास मिळते असे सांगितले. तसेच हा उपक्रम म्हणजे मुलांसाठी सुवर्णसंधी असल्याचे गौरवोद्गारही त्यांनी काढले.

सुधीर लंके यांनी हा उपक्रम सुरु केल्याबद्दल विद्यालयाचे अभिनंदन केले व नविन राष्ट्रिय शैक्षणिक धोरणातील वैशिष्ट्या प्रमाणे विद्यार्थ्यांची गरजा ओळखुन दिल्या जाणार शिक्षणाच्या जवळ जाणारा हा उपक्रम आहे. असे आपल्या मनोगतात विशद केले.

संस्थेचे सचिव अॅड. विश्वासराव आठरे पाटील यांनी आपल्या मनोगतात संस्थेचा इतिहास व संस्थेच्या स्थापनेमध्ये शाहू महाराजांचे असणारे योगदान याविषयी कथन केले. त्याचबरोबर स्पर्धा प्रचंड वाढलेली असली तरी देखिल जिद्द असल्यास काहीही अशक्य नसल्याचे त्यांनी सांगितले.

शेवटी अध्यक्षीय मनोगतामध्ये रा. ह. दरे यांनी विद्यार्थी जीवनामध्ये नियमित अभ्यास व उजळणी महत्वाची असून त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी शाररीक क्षमता चांगली ठेवण्यासाठी व्यायामाची कास धरावी असे सांगितले. चांगले मित्र बनविण्याचा व व्यसनापासून दूर रहाण्याचा वडिलकीचा सल्लाही त्यांनी यावेळी दिल.

या कार्यक्रमामध्ये पाहुण्यांचा परिचय प्रा. दत्तात्रय चौधरी यांनी करून दिला. कु. अर्चना दिनकर हिने मनोगत व्यक्त केले. सुधाकर सुंबे यांनी आभार मानले व सुत्रसंचालन प्रा. रविंद्र देवडे यांनी कैले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. धनंजय लाटे, प्रा. दिपक जाधव, प्रा. अप्पासाहेब पोमणे, प्रा. राजेश हिंगे, प्रा. रामदास गदादे, प्रा. भानुदास गायकवाड, रामदास जरांगे, भाऊ लांडे, श्री. चौरे आदिंनी प्रयत्न केले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

